शुक्रवार, ८ सप्टेंबर २०२३
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ३९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • FRIDAY 8 SEPTEMBER 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-39 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

## दहीहंडीचा उत्साह



खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर केंद्रीय प्राथमिक शाळेत दहीहंडीचा सण बालगोविंदांनी उत्साहात साजरा केला. मुख्याध्यापक सुरेश रहाणे, संजय बुचुडे, मार्तंड चौधरी, मिलिंद गिरधारी, रेखा खरात, सविता राऊत, पद्मा अधाने, कविता चव्हाण, परवीन बानो या शिक्षकांच्या प्रयत्नांमुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

# पावसाने फोडली प्रतीक्षेची हंडी

## शेतकऱ्यांना दिलासा : बुलढाण्यात धुक्याची चादर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यात अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पावसाने पुन्हा एन्ट्री केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईत सकाळपासून पाऊस पडतोय. तर ठाणे जिल्ह्यात तुफान पाऊस पडतोय. ठाणे जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर या शहारांमध्ये काल रात्रीपासून मुसळधार पाऊस पडतोय. याशिवाय पालघर, रायगड जिल्ह्यांमध्येही मुसळधार पाऊस पडतोय. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने राज्यात पावसाचे आगमन झाले.**

हिंगोली जिल्ह्यात अनेक दिवसांच्या खंडानंतर पावसाचे आगमन झाले. जिल्ह्यातील विविध ठिकाणी आज सकाळपासूनच रिमझिम तर काही ठिकाणी जोरदार पावसाला सुरुवात झाली. मागच्या काही दिवसांत पाऊस झाला नसल्याने पिके सुकत होती. आजच्या पावसामुळे पिकांना काहीसा दिलासा मिळणार आहे. मात्र बळीराजा अजूनही जोरदार पावसाच्या प्रतीक्षेत आहे. धुळे जिल्ह्यात तब्बल 17 दिवसांच्य प्रतीक्षेनंतर पावसाचे आगमन झाले. धुळे शहरासह, साखरी, शिंदखेडा, शिरपूर या तालुक्यात अनेक भागांमध्ये पावसाने सुमारे दीड तास हजेरी लावल्यामुळे बळीराजा सुखावला आहे. पावसाअभावी पिकांचे अतोनात नुकसान झाले असले तरी, आलेला पाऊस हा काहीसा दिलासा देणारा ठरला असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

धुळे जिल्ह्यामध्ये अजूनही मुसळधार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. मोठ्या खंडानंतर पडलेला हा पाऊस अनेक भागांमध्ये पिकांसाठी वरदान ठरणार आहे. गेल्या तीन महिन्यांपासून जिल्ह्यामध्ये समाधानकारक पाऊस पडलेला नाही. नदी, नाले वाहून निघतील असा पाऊस न पडल्यामुळे शेतकरी चिंतेत होते.

मात्र या चिंतातुर शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम आजच्या पावसाने केले असले तरी मोठ्या पावसाची आशा अद्यापही शेतकऱ्यांना आहे. बुलढाणा जिल्ह्यात मागील 20 दिवसांपेक्षा जास्त काळ उलटला तरी पावसाचे आगमन झाले नव्हते. त्यामुळे शेतातली पीके सुकून चालली होती. परिणाम उत्पन्नात घट होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले. अशा परिस्थितीत आकाशाकडे पाहून वाट बघत असलेल्या शेतकऱ्यांची आता थोडी का होईना चिंता मिटली. पिकांना जीवदान मिळाले आहे. काल रात्रीपासून जिल्ह्यात अनेक भागात रिमझिम पाऊस सुरू आहे. तर कुठे मध्यम स्वरूपाचा पाऊस झालाय. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. मात्र 20 दिवसांपेक्षा जास्त खंड पडल्याने उत्पादनात घट होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पिकांना सध्यातरी दमदार पावसाची अपेक्षा आहे.

**नांदेड जिल्ह्यात महिन्याभराने पाऊस :** नांदेडमध्ये आज दुपारपासून रिमझिम पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळालाय, आजच्या या सातत्याने बरसणाऱ्या पावसाचा फटका भाजीपाला विक्रेत्याना बसलाय . नांदेड जिल्ह्यातील अनेक आठवडी बाजारात आज भाज्या विक्रीसाठी शेतकऱ्यांनी गर्दी केली होती . मात्र पावसामुळे सर्वसामान्यांनी आठवडी बाजाराकडे पाठ फिरवलीय . त्यातून आज भाजीपाल्याच्या दरात मोठी घसरण झाल्याचे दिसते .

महाराष्ट्र शासनाच्या राज्य पत्रकार अधिस्वीकृती समिती अध्यक्षपदी यदू जोशी तर औरंगाबाद विभागीय अध्यक्षपदी डॉ. माधव सावरगावे





यांची निवड झाल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन...

शुभेच्छुक

वसंत मुंडे
प्रदेशाध्यक्ष

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

# अंगणवाडीत निकृष्ट धान्य वाटप; अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

## भोकर : बालकाचे आरोग्य धोक्यात


आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** बालपणापासून बाळाच्या आरोग्याची काळजी घेतली तर भविष्यात त्याचे शरीर सुदृढ होईल याची दक्षता घेवून शासनाने अंगणवाडी कार्यालयास सकस पोषण आहार देण्यासाठी नांदेड येथील कंत्राटदारांना जबाबदारी देण्यात आली. कंत्राटदार व अधिकारी याची मिलीभगत असल्याने चक्क निकृष्ट दर्जाचे धान्य पूरवठा होत असल्याने बालकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याची संबंधित वरिष्ठ अधिका-यानी चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

तालुक्यात एकुण (१६१) अंगणवाडी कार्यालय कार्यान्वित असून यावर अंकुश ठेवण्यासाठी तालुका एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. स्तनदामाता, गरोदर माता व अंगणवाडीतील ० ते तीन वर्ष आणि ३ ते ६ वर्षांच्या बालकांसाठी चना,साखर,चटणी,मुगदाळ,हळद असे धान्य नांदेड शहरातील एका कंत्राटदाला पुरवठा करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. प्लास्टिकच्या पिशवीत हलक्या दर्जाचे धान्य बंद करून टेम्पोव्दारे जिल्ह्यातील अंगणवाडीला दिला जातो.यासाठी शासनाने कोट्यवधी रूपयाची निधी मंजूर केला आहे.निकृष्ठ दर्जाचं धान्य देत असल्याने बालाकाचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेकदा तक्रारी झाल्या पण अधिकारी केवळ उद्दिष्टपूर्तीसाठी कार्यवाही करून मोकळे झाल्याने कंत्राटदार मालामाल होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.




**निकृष्ट धान्याचा टेम्पो केला परत :** मागील महिन्यात नांदेड येथील धान्य पुरवठा करणाऱ्या कंपणीने नेहमी प्रमाणे हलक्या प्रतीचे धान्य वाटप करणारा टेम्पो नांदेड रस्त्यावर असलेल्या वाकद (ता .भोकर) येथील अंगणवाडीस देण्यासाठी आला असता येथील ग्रामस्थांनी सदरील धान्य हलक्या प्रतीचे आहेत म्हणून परत पाठवला आहे . याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना असताना सुध्दा कसलीच कार्यवाही करण्यात आली नाही . स्थानिक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी मध्यस्थी करून या प्रकरणावर पडदा टाकला आहे .यावेळी मोठी आर्थिक उलाढाल केल्याची विश्वनिय माहिती आहे .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

श्यामरावांचे हे मनोगत संपताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. शनिवारी संध्याकाळी भगवानराव श्यामरावांच्या घरी त्यांचं अभिनंदन करण्यासाठी आले. त्यांनी श्यामराव आणि श्यामलाताईंचं मिठाई देऊन अभिनंदन केलं. मुलांसाठी स्वामी विवेकानंद आणि सुधा मूर्ती यांच्या गोष्टीची पुस्तके भेट म्हणून आणली आणि त्यांचं कौतुक केलं. भगवानरावांसोबत भार्गवी वहिनी आणि चैतन्य पण आला होता. आज रात्रीचं जेवण सगळे बरोबरच घेणार होते. भगवानरावांबरोबर मुलांची मैफल छान जमली. पिंकी म्हणाली, ' काका, मागच्या वेळी तुम्ही आम्हाला प्राचीन समृद्ध भारताबद्दल माहिती सांगत होता. पण आपलं बोलणं अपूर्ण राहिलं. तुम्ही म्हणाला होता की पुढील वेळेस आणखी माहिती सांगेन म्हणून. ' हो, सांगतो ना बाळांनो. पण आपण आज काय परिस्थिती आहे ते जाणून घेऊ. आज आपण खेड्यात गेलो की आपल्याला त्यांची दुर्दशा झालेली जाणवते बरं का ! कधी पुरेसा पाऊस पडत नाही, त्यामुळे दुष्काळ पडतो. कधी अति पावसाने शेतीचं नुकसान होतं. पिकं हातात येत नाहीत, म्हणून पैसा नाही. पैसा नाही म्हणून गरिबी,बेकारी, उपासमार हे दुष्टचक्र सुरु होतं. गावातील लोकांना काही कामधंदा नाही. कामधंदा मिळवण्यासाठी लोकांचा ओढा शहरांकडे असतो. बरीचशी खेडी त्यामुळे आजकाल उजाड वाटतात. '' अगदी बरोबर आहे काका. पण आम्ही सोपानकाकांकडे गेलो होतो, ते गाव आम्हाला आवडलं. पण अशी गावं अपवादात्मक असतील, होय ना काका ? '' बरोबर आहे बेटा. पण पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. आता मला सांग आपण स्वतंत्र कधी झालो ?' ' १५ ऑगस्ट १९४७ ला, ' चैतन्य पटकन म्हणाला. ' बरोबर आहे, त्यापूर्वी दीडशे ते दोनशे वर्षे आपण पारतंत्र्यात होतो. म्हणजे आताची स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची ७५ वर्षे आणि त्यापूर्वीची दीडशे वर्षे असा दोन अडीचशे वर्षांचा काळ सोडला तर त्यापूर्वी आपल्या भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. खेड्यांमध्ये आर्थिक सुबत्ता होती. लोकांना रोजगार आपल्या गावातच उपलब्ध होत होता. म्हणजे बाबा, आज जसे शहरात कारखाने आहेत, तसेच तेव्हा खेडयांमध्ये होते का ? ' चैतन्यने विचारले. ' बाळांनो, आज जसे आधुनिक यंत्रसामुग्रीने संपन्न असे कारखाने आपल्याला दिसतात, तसे त्यावेळी नव्हते. यंत्रक्रांती किंवा औद्योगिक क्रांती अठरा एकोणिसाव्या शतकात युरोपात आधी झाली. पण त्याआधी शेकडो वर्षांपासून भारतातील ग्रामीण भागातील लोक आपले परंपरागत व्यवसाय करीत होते.



## समृद्ध प्राचीन भारत



## आनंदी पहाट

### अन्न हे पूर्णब्रह्म

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण ज्या सृष्टीत राहतो, त्या सृष्टीशी साम्य राखून आरोग्यप्राप्ती करणे सहज शक्य आहे. आजकाल प्रत्येकाच्या घरात वाटर प्युरिफायर आलेले आहेत. पूर्वीच्या काळी मात्र घरोघरी माठ असायचा आणि तो माठ ठेवण्यासाठी तिवई असायची. या तीन पाण्याच्या तिवईवर पूर्ण माठाचा भर तोललेला असायचा. याप्रमाणेच हा शरीररूपी माठ ज्या तीन पायांच्या तिवईवर तोललेला आहे. हे साहाय्यक पाय म्हणजे आहार, विहार आणि निद्रा होय. ह्यावरच सर्व शरीरक्रिया, आरोग्य अवलंबून आहे. अन्न हे प्राणधारण करणाऱ्यांचा प्राण आहे. म्हणून ह्या सृष्टीतील सर्व सजीव अन्नामागे धावत असतात. शरीराचं बळ, वर्ण, पुष्टी, बुद्धी आणि सुख अन्नावरच अवलंबून आहे. आपण अन्नाचं ग्रहण करताना खरंच ह्या बाबींचा विचार करतोच असे नाही. अन्नाची निवड करताना काय खावं आणि काय खाऊ नये हे अभ्यासपूर्वक समजून घेत नाही. ते काहीवेळा माहित असूनही आपण आपल्या शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टीकोनातून असंच अन्न घेत नाही.

ह्या अन्नावरच सगळं जीवन अवलंबून असतं. त्यामुळे आहारात काय घ्यावं, कसं घ्यावं, किती घ्यावं; ह्या बाबी खूप महत्वाच्या आहेत. सगळ्यांनी असा आहार सेवन करायला हवा की जो आपल्या शरीराचं स्वास्थ्य टिकवून ठेवेल आणि रोग उत्पन्न होऊ देणार नाही. गरम, स्निग्ध, योग्य मात्रेत, पहिलं अन्न पचल्यावर, मनाला आवडेल अशा ठिकाणी सर्व योग्य सामग्रीसह, फार भरभर नाही आणि हळूही नाही, असं न बोलता हसत आनंदी वातावरणांत, जेवणाकडे पूर्ण लक्ष देऊन अन्न घ्यावं. आपल्या पचनक्रियेसाठी, शारीरिक स्वास्थ्यासाठी ते अत्यंत महत्वाचं, म्हणूनच अधिक जरुरीचं असतं.



आधुनिक केसरी

### ब्रह्मानंद हाती आला ||

नाम तुझे येता मुखी | सारी सुखे दास होती ||१||
माझे तुझे सारे गेले | रूप सावळे देखिले ||२||
टाळ मृदंग संगे गाती | चैतन्याची वीणा हाती ||३||
श्वास पाऊली खेळतो | वाट पंढरी चालतो ||४||
कर्म श्रेष्ठ जाण मना | फेडी जन्माची रे दैना ||५||
भेदाभेद सारा गेला | ब्रह्मानंद हाती आला ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

अप्राप्तं मङ्गलं यच्च देहि मे सत्वरं शिवे |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं
नमाम्यहम् || ८४ || हे शिवे, अप्राप्त असे जे मंगल आहे, ते मला सत्वर दे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

ब्रह्मविद्या परकाश से, मोह निशा भ्रम नाश ।
चेतन चेत प्रबुद्ध है, कलुष कर्म दुख नाश
।।०५।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/०५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मविद्येचा प्रकाश झाल्यावर मोह, अज्ञानाचा नाश होतो आणि समस्त शुभाशुभ कर्म तसेच दुःखांचा अभाव झाल्याने आत्मा आपल्या चैतन्यमय स्वरूपाने प्रकाशीत होऊन जागृत होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सिध्दलक्षण



आधुनिक केसरी

उन्मनीमध्ये ज्ञाता व ज्ञेय,द्रष्टा व दृष्य,मी व तू किंवा देव व भक्त हा द्वैत भाव उरत नाही.मग विश्वातील द्वैत,भेद किंवा द्र्युष्य वस्तूंचा पसारा डोळ्यासमोर दिसत असून सुध्दा त्यामध्ये आत्मस्वरूपच दिसते.
असा अनुभव येतो. याठिकाणी असे अनुभवास येते की जेथे साधकाचे अज्ञान नाहीसे होते व तो ब्रम्हस्वरूप होतो. देहबुद्धीचा नाश =आत्मज्ञान=परमात्म्याच्या स्वरूपाचे ज्ञान=सर्व भूतमात्रेत आपणचं भरून आहोत असा अनुभव येतो.
असा अनुभव असल्यावर सतत यशस्वी होणारा पुरूष सिध्द पुरूष होय. बृहदारण्यक उपनिषदामध्ये याज्ञवल्क्य ऋषींनी जे सिध्दावस्थाचे वर्णन केले आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## बद्ध आणि मुक्त यांतला फरक

आधुनिक केसरी

बद्ध हे जगाचे असतात. मुक्त हे जगाचे नसून एका भगवंताचे असतात. संतांची चवकशी करताना, त्याची उपासना कोणती, गुरू कोण हे पाहतात. त्याच्या आईबापांची नाही चौकशी करीत. संतांना देहाची आठवण नसते. ते आपला देहाभिमान, मीपण, भगवंताला देतात. परमात्म्यापेक्षा विषयाची गोडी ज्याला जास्त तो बद्ध. विषयाचे प्रेम कमी होणे म्हणजे मुक्तदशेच्या मार्गाला लागणे, ' मी भगवंताचा ' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. आपण बद्ध आहोत हे तरी आपणच बद्ध आहोत ही भावना करून घेतली म्हणून. आपण, मूळ तेच रूप स्वयंसिद्ध असताना, सर्व इंद्रिये मिळून होणारा देह मी आहे असे म्हणतो; आणि त्यामुळे देहाला जे सुखदुःख होते ते आपल्याला झाले असे म्हणतो. आत्मा स्वतः त्यापासून अलिप्त असतो. परंतु आत्मा आणि देह वेगळा नाही असे आपण म्हणत असतो; म्हणून मी तोच देह आणि हा देह तोच आत्मा, अशी आपली भावना दृढ झालेली असते. परंतु आपण बोलण्यात मात्र ' माझा ' हात दुखावला किंवा 'माझ्या ' पोटात दुखते, असे म्हणतोच की नाही ? म्हणजे, प्रत्येक अवयव 'माझा' म्हणणारा कुणीतरी वेगळा आहे हे खरे; आपल्याला ते बरोबर समजत नाही इतकेच. मीपणा हा आपल्यात इतका बाणलेला असतो.



आपले मन विषयाच्या आनंदात रंगले, म्हणून तिथे आपण आपलेपणाने वागतो. परंतु विषयच जिथे खोटे, तिथे मन रंगूनही, ते नाहीसे झाले म्हणजे आपल्याला दुःख हे होणारच. आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिलो म्हणूनही सुखदुःख होते. म्हणून , आपण त्या सर्वांपासून निराळे आहोत असे समजून वागावे. हे होण्यासाठी परमेश्वराची भक्ति करायला पाहिजे. भक्तिला जर काही आड येत असेल तर आपली देहबुद्धीच होय; आणि ती गेल्याशिवाय खरी भक्ति होणारच नाही. तरी आपण परमेश्वराचे आहोत असे समजून वागावे. जे जे होईल ते ते त्याची इच्छा म्हणून झाले असे समजून वागू लागलो, म्हणजे आपली देहबुद्धी हळूहळू कमी होत जाईल. याकरिता काही तप, याग वगैरे करावे लागत नाही. संसार सोडून वनातही जावे लागत नाही आणि विशेष आटाआटीही करावी लागत नाही. जे घडते ते ' मी केले' हा मीपणा टाकून, ' मी देवाचा आहे ' असे म्हणून, आणि जे होईल त्यात आनंद मानून राहावे, म्हणजे मीपणा सुटत जाईल. हे ' मी ' केले नाही, परमात्म्याच्या इच्छेने झाले, असे मानले म्हणजे मीपणा राहिला कुठे ?

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

ज्यांच्या मस्तकावर सुशोभित जटा आहेत.कपाळावर कस्तुरी चंदन मिश्रीत तिलक लावलेला आहे त्यामुळे त्यांचे विस्तीर्ण असे मुख कमल अतिशय देदीप्यमान दिसत आहे.असे गुरुवर्य आज माझ्या घरी आले. ज्यांच्या गळयात रुद्राक्षाच्या माळा असून काखेला त्रिलोक्याचे रक्षण करणारी झोळी तर कासेला उपवस्त्र अशा रूपातील माझे गुरुवर्य आज माझ्या घरी आले आहेत.

कृष्णा नदीच्या तटाजवळील कुरु व्दिपात वास्तव्य असणारे परमपुरुष श्रीपाद योगी असे माझे गुरुवर्य आज माझ्या घरी आले आहेत माझे गुरुवर्य भक्त कल्प द्रुम आणि पूर्ण सचीतानंद दत्त दिगंबर असून जी गुरु परंपरा भगवान शंकरा पासून सुरु झाली आहे ते गुरुवर्य आज माझ्या घरी आले आहेत. अशा प्रकारच्या उत्कृष्ठ भावनेच्या मानस पूजेने गुरुवर्य निश्चितच प्रसन्न होतील मग . स्वामी चरण जेथे , न्युन काय तेथे ? समाधानाने रहावे .जेथे सद्गुरूंचे चरण असतात तेथे ज्ञान असते .



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

सिद्ध करूनियां ठेविलें कांडण । मज सांगातीण शुद्ध बुद्धि गे ॥१ ॥
आठव हा धरीं मज जागें करीं । मागिले पाहारीं सेवटिचा गे ॥ध्रु. ॥
सम तुकें घाव घालीं वो साजणी । मी तुजमळिणी जंव मिळे ॥२ ॥
एक कशी पाखडी दुसरी निवडी । निःशेष तिसडी ओज करी ॥३ ॥
सरलें कांडण पाकसद्धि करी । मेळवण क्षिरीसाकरेचें ॥४ ॥
उद्धव अक्रूर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ॥५ ॥
तुका म्हणे मज माहेरीं आवडी । म्हणोनि तांतडी मूळ केलें ॥६ ॥
सावडीं कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सार ॥१ ॥
मुसळ आधारीं आवरूनि धरीं । सांवरोनि थिरीं घाव घालीं ॥ध्रु. ॥
वाजती कांकणें अनुहात गजरें । छंद माहियेरे गाऊं गीति ॥२ ॥
कांडिता कांडण नव्हे भाग शीण । तुजमजपण निवडे तों ॥३ ॥
तुका म्हणे रूप उमटे आरिसा । पाक त्या सरिसा शुद्ध जाला ॥४ ॥
शुद्धीचें सारोनि भरियेली पाळी । भरडोनि वोंगळी नाम केलें ॥१ ॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, ८ सप्टेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

## पोलिस ठाण्यातील तीन कर्मचाऱ्यांना बढती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथील तीन पोलिस कर्मचाऱ्यांना बढती मिळाली असून विभागीय पोलिस अधिकारी व पोलिस निरीक्षक यांच्या हस्ते बढती स्टार लावून सन्मानित करण्यात आले. हेडकॉन्स्टेबल मनोहर पुंगले, रतन वारे, पोलिस नायक शेख जाकीर या तिघांना बढती मिळाली. विभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड व पोलिस निरीक्षक भुजंग हातमोडे यांच्या हस्ते स्टार लावून सन्मानित करण्यात आले. दोघांची साह्यक पोलिस निरीक्षक व एकाची हेडकॉन्स्टेबल म्हणून बढती मिळाली आहे. यावेळी सपोनि.अमोल ढाकणे, पोउनि जनार्दन मुरमे,संजय बहुरे, संतोष भालेराव, योगेश ताठे उपस्थित होते.




# शासकीय रकमेचा अपहार केल्याने पोलीस निरीक्षकावर गुन्हा नोंदवण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज





**शिर्डी :** शिर्डी पोलीस स्टेशन अंतर्गत बेवारस स्थितीत आढळून आलेल्या मोटारसायकल लिलावाची अंतीम बोली आठ लाख बावन्न हजाराची असतांना शासकीय कोषागारात दोन लाख पन्नास हजारच भरल्याने शासनाची सहा लाख दोन हजाराची फसवणूक झाल्याने पोलीस निरीक्षक नंदकुमार दुधाळ यांच्यावर शासकीय रकमेच्या अपहाराचा गुन्हा नोंदवण्याची मागणी कोळपेवाडीचे सामाजिक कार्यकर्ते रमेश भोंगळ यांनी पोलीस महासचांलकाकडे केली आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक यांना पाठवलेल्या तक्रार अर्जात भोंगळ यांनी म्हटले आहे की, शिर्डी पोलीस स्टेशन अंतर्गत बेवारस स्थितीत आढळून आलेल्या ८५ मोटार सायकलचा जाहीर लिलाव २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जुन्या शिर्डी पोलीस स्टेशन हॉलमध्ये घेण्यात आला. लिलावात दहा हजार डिपॉझिट भरुन ८७ भंगार लायसन्स धारकांनी सहभाग घेतला. हालमध्ये जाण्यापूर्वी निरीक्षक दुधाळ यांच्या सांगण्यावरुन पोलिसांनी लिलाव धारकांचे मोबाईल सायलंट मोडवर ठेवण्याचे सांगत सर्व मोबाईल जमा करून एका कोपऱ्यात ठेवण्यात आले. सरकारी किंमत दोन लाखाच्या पुढे ठेवून बोली बोलण्यास सुरुवात झाली. बोली वाढत वाढत जात रिजवान पठाण यांनी आठ लाख एक्कावन्न हजार केले. तर अंतिम बोली निहाल शेख यांनी आठ लाख बावन्न हजार केली. तीन वार होवून शेख यांना वरिल रकमेला लिलाव देण्यात आला. लिलावात सामाजिक कार्यकर्ते रमेश भोंगळ यांनी प्रत्यक्ष हजर राहुन लिलावाच्या सर्व कामकाजाचा आढावा घेतला. जाहीर ओपन लिलाव असतांना मोबाईल जमा करण्याचे कारण काय? असा संशय भोगंळ यांना आल्याने त्यांनी २६ ऑगस्ट रोजी शिर्डी पोलीस स्टेशनला माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अर्ज केला. २ सप्टेंबरला मिळालेल्या रजिस्टर पोहच माहितीमध्ये शिर्डी पोलीस स्टेशनच्या नावाने शासकीय कोषागारामध्ये दोन लाख पन्नास हजार भरल्याचे चलन देण्यात आले. जाहीर लिलावानुसार शासकीय कोषागारामध्ये आठ लाख बावन्न हजाराचे चलन भरणे अपेक्षित असताना शिर्डी पोलीस निरीक्षक नंदकुमार दुधाळ यांनी शासनाचे सहा लाख दोन हजार रुपये कागदोपत्री फेरफार करुन लबाडीच्या ईराद्याने स्वःत्ताच्या फायद्यासाठी वापरले असल्याचा दाट संशय निवेदनावर सह्या करणारे रमेश भोंगळ, नाशिर शहा, अब्दुल रेहमान, शहा रफिक, शेख जलील, शहा रफिक पठाण सरदार शहा यांना असुन दुधाळ यांचेवर सरकारी रकमेचा अपहार व फसवणूकिचा गुन्हा नोंदवण्यासाठी खातेनिहाय चौकशीची मागणी पोलीस महासंचालकाकडे केली आहे.

## मराठा आरक्षणासाठीच तरुणाची आत्महत्या, ग्रामस्थांचा दावा

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठीच गावातील तरूणाने आत्महत्या केली असल्याचा दावा उमरगा तालुक्यातील माडज येथील ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे बुधवारी सायंकाळपासून उमरगा तालुक्यात तणाव निर्माण झाला होता. गुरूवारी मृतदेह घोषणाबाजी करीत उमरगा उपजिल्हा रूग्णालयात आणण्यात आला. उत्तरीय तपासणीनंतर जमाव उपविभागीय कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर धडकला. त्याचवेळी शासकीय विश्रामगृहासमोर दोन तरूणांनी कार पेटवून देत मराठा आरक्षणासाठी जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर माडज येथे मयत तरूणावर अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्यभर मराठा आरक्षणासाठी वेगवेगळी आंदोलने सुरू आहेत. त्यातच माडज येथील किसन माने या तीस वर्षीय तरूणाने बुधवारी गावातील शिवकालीन तलावात उडी घेवून आत्महत्या केली. मराठा समाजाच्या आरक्षणासाठीच त्याने आत्महत्या केली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामस्थांच्या भावनांची दखल घेवून महसूल व पोलीस प्रशासनाने याबाबत वरिष्ठांपयर्ंत माहिती पोहोचवली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलीस प्रशासन माडज येथील घटनेवर लक्ष ठेवून होते. घटनेनंतर सकल मराठा समाजाकडून उमरगा शहर बंदचे आवाहन समाजमाध्यमांवर करण्यात आले. त्यामुळे गुरूवारी उमरगा शहरासह नारंगवाडी आणि माडज या दोन्ही गावात कडकडीत बंद पाळण्यात आला. उमरगा बस आगारातून एकही बस सोडण्यात आली नाही. आत्महत्त्या केलेल्या तरूणाचा मृतदेह माडज येथून उमरगा शहरापर्यंत घोषणाबाजी करीत आणण्यात आला. उपजिल्हा रूग्णालयात मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आली. त्यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, स्थानिक आमदार ज्ञानराज चौगुले, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबा पाटील, काँग्रेसचे प्रदेश सचिव दिलीप भालेराव, राष्ट्रवादी युवतीच्या सक्षणा सलगर, भाजपाचे कैलास शिंदे, किरण गायकवाड, बसवराज वरनाळे, रज्जाक अत्तार, शौकत पटेल, विनायक पाटील, अमर बिराजदार आदी विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ३९ जणांवर वीजचोरीचे पोलिस ठाण्यात गुन्हे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या हर्सूल, सावंगी, माळीवाडा तसेच वाळूज महानगर शाखेतील तब्बल ३९ वीजचोरांवर छावणी व चिकलठाणा ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नायगाव येथील महमूद शेख, भिकन कसारे, शेख नजीर, सखाराम कसारे, शकुंतला तांबे, दौलत कसारे, सुदाम कसारे, परसराम कसारे, ओंकार कसारे, शफी सय्यद, एकनाथ कसारे, साईनाथ कसारे, सोमीनाथ कसारे, अनिल कसारे, सोमीनाथ बत्तीसे, सतीश कसारे, संजय पवार, महमूद शेख व शफिक शेख, वडगाव कोल्हाटी येथील प्रतिभा सूर्यवंशी, विक्रम जाधव, रमेश दमधर, पुरुषोत्तम कोकाटे,पद्मधर कोकाटे आणि माळीवाडा येथील लताबाई अंगरे, सुनीता आस्वार, सुनील शिंदे, अन्नू गायकवाड, सिद्धार्थ साठे, सुनील साठे, अलका वालेकर, सत्यभामा दणके, गणेश खंडागळे, प्रकाश भालेराव, कैलास गायकवाड, बाबुराव रंधे, सूर्यभान साठे, गौतम साठे, सविता साठे या वीजचोरांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या आदेशाने अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, कार्यकारी अभियंता विष्णू ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली वीजचोरीविरोधात धडक मोहीम राबवण्यात आली. विविध गावांत घरगुती व व्यावसायिक वापरासाठी मीटरमध्ये फेरफार व विद्युत वाहिनीवर आकडे टाकून चोरी करणाऱ्या एकूण २३३ चोरांवर करण्यात आली असून वीजचोरीपोटी त्यांना दंड २७ लाख ६० हजारांचा दंड आकारण्यात आला आहे. यापैकी ७४ लोकांनी पैसे न भरल्यामुळे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती औरंगाबाद ग्रामीण -१ उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता प्रवीण पवार यांनी दिली.




## औरंगाबाद विभागीय अधिस्वीकृती समिती अध्यक्षपदी डॉ. माधव सावरगावे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** विभागीय अधिस्वीकृती समितीच्या अध्यक्ष निवडीची बैठक आज पार पडली. या बैठकीत साम टि. व्ही. चे डॉ. माधव गुणवंतराव सावरगावे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. विभागीय संचालक (माहिती) कार्यालयात आयोजित बैठकीत ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली, त्यात समितीचे सदस्य चक्रधर दळवी, अनिल महाजन, डॉ. माधव सावरगावे, विनोद काकडे, अरुण सुरडकर यांनी सहभाग घेतला.

डॉ.माधव सावरगावे यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. औरंगाबाद विभागाचे संचालक (माहिती) किशोर गांगुर्डे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून औरंगाबादचे जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी काम पाहिले. यावेळी समिती सदस्यांसह माहिती अधिकारी डॉ मीरा ढास, सहायक संचालक गणेश फुंदे उपस्थित होते.

# 'आदित्य'चे भ्रमण

आधुनिक केसरी

चांद्रयान-3 च्या यशानंतर भारताच सध्या आदित्य L 1 मिशन सुरु आहे. आदित्य एल 1 ही भारताची पहिली सूर्य मोहीम आहे. मागच्या शनिवारी आदित्य एल 1 च आंध्र प्रदेशच्या श्री हरिकोटा येथील सतीश धवन अवकाश तळावरुन यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं. आदित्य एल 1 ला सूर्याच्या कक्षेपर्यंत पोहोचण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सध्या हे यान पृथ्वीच्या कक्षेत भ्रमण करत आहे. आदित्य एल 1 वर आतापर्यंत दोन मॅन्यूव्हर झाले आहेत. म्हणजे चांद्रयान-3 प्रमाणे आदित्य एल 1 चा टप्याप्याने कक्षा विस्तार सुरु आहे. आदित्य एल -1 ला हळूहळू पृथ्वीच्या कक्षेपासून लांब नेलं जात आहे. आदित्य एल 1 ने सध्या सुरु असलेल्या प्रवासात काही फोटो काढले आहेत. आदित्य एल 1 15 लाख किलोमीटर पर्यंतचा प्रवास करायचा आहे. सूर्य आणि पृथ्वीच्यामध्ये लॅगरेंज पॉइंट आहे. तिथे आदित्य एल 1 ला स्थापित करण्यात येईल. L 1 पॉइंटवरुन सूर्यावर पूर्णवेळ लक्ष ठेवता येईल. या पॉइंटरवरुन कुठल्याही ग्रहणाचा प्रभाव, परिणाम सूर्यावर दिसणार नाही, फक्त सूर्यावर जे काही घडत ते समजेल. आदित्य एल 1 उपग्रह एकप्रकारे इस्रोची सूर्याजवळची वेधशाळा असेल. सूर्यावर बरच काही घडत असतं. सूर्यावर वादळ येतात. अजून तिथल्या बऱ्याच घडामोडी समजणार आहेत. L 1 ही अवकाशातली अशी जागा आहे, जिथे पृथ्वी आणि सूर्याची गुरुत्वकर्षण शक्ती समतोल आहे. तिथे इस्रो यानाला स्थापित करेल. 2 सप्टेंबरला PSLV रॉकेटने आदित्य एल 1 ला प्रक्षेपित केलं. 16 दिवस आदित्य एल 1 पृथ्वीच्या कक्षेत भ्रमण करेल.इस्रोने आदित्य एल 1 ने काढलेले फोटो रिलीज केले आहेत. आदित्य एल 1 ने पृथ्वी आणि चंद्राचे फोटो काढले आहेत. सेल्फीमध्ये आदित्यमधील VELC आणि SUIT हे दोन पेलोड दिसतात. आदित्यने पृथ्वीचा जवळून फोटो काढला आहे. यात चंद्र दूर अंतरावर दिसतोय. भारताच चांद्रयान-3 मिशन सुद्धा यशस्वी ठरलं आहे. 23 ऑगस्टला चंद्रावर सॉफ्ट लँडिंग केल्यानंतर चांद्रयान 3 मधील विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हरने सर्व चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. सध्या दोघेही स्लीपर मोडमध्ये आहेत. 22 सप्टेंबरला चंद्रावर सूर्यप्रकाश आल्यानंतर लँडर आणि रोव्हर पुन्हा काम करणार का? याची उत्सुक्ता आहे. कारण लँडर आणि रोव्हरची रचना 14 दिवसांच्या हिशोबाने करण्यात आली होती.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# देशाचे नाव व राजकारण...


आधुनिक केसरी

**देशातील राज्यकर्ते नागरिकांना मूर्ख समजून नको त्या विषयांवर राजकारण करून मुख्य मुद्यावरुन लक्ष विचलित करत आहेत. सर्व सामान्य लोकांचे प्रश्न, समस्या, अडचणी व त्यावरील उपाय यासाठी कोणताही राजकीय पक्ष ठामपणे भुमिका घेताना दिसत नाही. आपल्या देशात रंग, जात, धर्म यावरून वातावरण दुषीत करून दोन गटात, समुहात, धर्मात तेढ निर्माण करून त्या मुद्यांवर नेहमी चर्चा घडवून आणल्या जातात. अशा मुद्यांवर चर्चा घडवून आणुन लोकांना जात, धर्म व समुदाय धोक्यात आहे, म्हणून ते कट्टरतेकडे वळून मुळ समस्येवर उपाय शोधुच नाही म्हणून नको त्या मुद्याला गरम करून चर्चा केली जाते. लव जिहाद, हिंदु मुस्लिम, गोमांस असे विषय उकरून काढून दोन धर्मांमध्ये वाद पेटवले जातात.**

जातीची घाण डोक्यात टाकुन अशा मुर्ख लोकांना महापुरूषांचे विचार व जयंतीला विरोध करायला लावला जातो, आरक्षणा बद्दल चुकिची व दिशाभूल करणारी माहिती देऊन दोन गटात वाद निर्माण केला जातो. मग लोकांसमोर प्रश्न पडतो आपल्या जाती धर्मावर अन्याय होत आहे भारत जाती प्रधान असल्याने प्रत्येकाला जात महत्वाची आहे खोलवर बिंबवले आहे परंतु खरंच हिंदु मुस्लिम वाद होणार नाहीत, जातीची घाण डोक्यात असलेल्या लोकांची महापुरुषांचे विचार व जयंती याला विरोध करण्याची हिंमत होणार नाही, आरक्षणा बद्दल प्रश्न उपस्थित राहणार नाही यावर कोणत्याही प्रकारच्या कायम स्वरुपी उपाययोजना केल्या जात नाहीत. नागरिकांनी मुळ समस्येवर बोलुच नाही किंवा त्याकडे लक्षच जाऊ नाही म्हणून मात्र खुप काळजी घेतली जाते. देशात लोकांच्या विरोधात, संविधान विरोधी अनेक कृत्य घडवून आणले जातात, तरीही लोकांना त्यांची जाणीव नाही कारण लोक सामाजिक समस्या व भारतीय संविधान या बद्दल जागृत नाहीत. प्रत्येक घरात सुशिक्षित व्यक्ती आहे परंतु घराघरात संविधान नाही. म्हणजे संविधानामुळे शिक्षण, आरक्षण, नोकरी, हक्क अधिकार, मानवी स्वातंत्र्याची फळे चाखताना आनंद वाटतो परंतु संविधान आणि संविधान निर्माते बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व फोटो घरात आणायची आजही लाज वाटते. ही देशासाठी लाजीरवाणी बाब आहे. हक्क अधिकार व संविधानाने दिलेले स्वातंत्र्य घेताना जो स्वाभिमान आणि वरचा आवाज आहे तोच आवाज संविधान वाचण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि संविधाना विषयी बोलण्यासाठी हिंमत होत नाही हे केवळ जाती मुळेच. देशाचे संविधान लिहणाऱ्या महापुरुषांची जात बघून संविधान वाचल्या जात नसेल तर अशा लोकांना नेमकं काय म्हणावे? संविधान लोकांचे हक्क अधिकार या बद्दल कोणताही राजकीय पक्ष, सरकार जागृती करत नाही. दोन समुहात एकोपा निर्माण होईल जातीवाद, जातीय, धार्मिक द्वेष कमी होईल यासाठी चर्चा घडवून आणली जात नाही. सुशिक्षित समजणाऱ्या देशात संविधान वाचण्याची लाज व जातीभेद करण्यासाठी माज वाटतो अशा लोकांना काय म्हणावं? लोकांना अज्ञानी ठेऊन गुलाम बनवून सत्ता प्रस्थापित करून केवळ द्वेषाचे व निरर्थक राजकारण केले जाते. रोजगार, शिक्षण, आरोग्य, महागाई, महिला अत्याचार, सामाजिक न्याय याबद्दल कोणीही मजबूत भुमिका घेताना दिसत नाही. सध्या देशात नावाविषयी राजकारण तापवले जात आहे. भारतीय संविधानाचे कलम क्रमांक एक यामध्ये स्पष्ट देशाचे नाव लिहले आहे INDIA THAT IS BHARAT, इंडिया अर्थात भारत. म्हणजे देशाला भारत किंवा इंडिया याच नावाने संबोधले पाहिजे. सध्या देशांतर्गत भारत सरकार या नावाखाली व्यवहार चालतो, प्रादेशिक भाषेमधुन भारत सरकार असेच लिहले बोलले जाते. जेव्हा इंग्रजी भाषेचा वापर केला जातो किंवा परराष्ट्रीय व्यवहार केले जातात तेव्हा मात्र इंडिया चा वापर केला जातो. देशातील नागरिक व सरकार दोन्ही नावाचा वापर करू शकतात त्यासाठी त्यांच्या वर कोणतेही बंधने नाहीत. तरीही देशाच्या नावावर राजकारण करून राजकारणी लोक निव्वळ टाईमपास करून जनतेची दिशाभूल करत आहेत. उगवलेला प्रत्येक दिवस हा फक्त राजकारणी लोकांच्या फायद्याचा आहे लोकांसाठी अच्छे दिन तर एक स्वप्नच आहे. सरकारने इंडिया नावाऐवजी भारत हा वापरला म्हणून काही विरोधक विरोधात गेले. इंडियाच शब्द वापरायला पाहिजे असा हट्ट धरत आहेत. तर सरकार इंडिया शब्द गुलामी दाखवते म्हणून भारत शब्दच वापरणे योग्य असल्याचे सांगत आहे. मुळात घटनेच्या कलम क्रमांक एक देशाचे दोन्ही नाव दिलेले आहे म्हणून यावर राजकारण नकोच होते पण त्याला राजकारणाचा मुद्दा बनवला. सरकार आज म्हणते इंडिया



शब्द गुलामी दर्शक आहे म्हणून भारत वापरा. पण मेक ईन इंडिया, स्टँड अप इंडिया, स्टार्टअप इंडिया, शायनिंग इंडिया या नावाने गाजावाजा करताना सरकार ला ह्याचे भान नव्हते का? इंग्रजी भाषेतील व्यवहार व परराष्ट्रीय व्यवहार इंडिया शब्द वापरून केला जातो मग त्या ऐवजी भारत शब्द वापरायचा तर सर्वांना विश्वासात घेऊन सरकारने चर्चा करायला पाहिजे कोणतीही मनमानी करायला देश कोणाची खाजगी संपत्ती नाही. आणि विरोधकांनी विरोध करायचा ह्याचे थोडे गांभीर्य पाहिजे. देशातील सार्वजनिक मालमत्ता विकल्या जात आहेत, ईव्हीएम मध्ये घोटाळा करून सरकार बनत आहेत, भ्रष्टाचार व बलात्काराचे आरोप असलेल्या लोकांना मंत्रीपद दिल्या जात आहेत तेव्हा कोणीच विरोध करत नाहीत. लाखो करोडोचा निधी जनकल्याणासाठी येतो परंतु तो खर्च होतो की यावर कधीच कोणी बोलत नाही. म्हणजे संसद आणि राज्य विधिमंडळ केवळ खासदार आणि आमदार यांच्या वैयक्तिक लाभासाठी बनवले गेले आहे का? जनतेच्या हिताचे सर्वांगीण बाजु मांडणारा नेता किंवा राजकीय पक्ष शिकल्लच राहीला नाही. देशात जनता राजा आहे आणि राज्याचेच हाल सेवकाकडून होत आहेत. याला च नितीमत्ता म्हणायचे का? विरोधक भारत देशाच्या नावासाठी न्यायालयात गेले भारत नाही तर इंडिया म्हणायला पाहिजे. अशा विरोधकांना एवढेही कळू नाही की भारत आणि इंडिया दोन्ही शब्द घटनेमध्ये नमुद आहेत म्हणजे दोन्ही शब्द वापरू शकतो. जेव्हा देशाला भारत आणि इंडिया या व्यतीरीक्त हिंदुस्थान म्हणून हेच विरोधक बोलतात तर हिंदुस्थान हा संविधानीक शब्द आहे का? भारत किंवा इंडिया नावाऐवजी हिंदुस्थान शब्द वापरला जातो आणि हे घटना बाह्य आहे यावर विरोकांनी न्यायालयात जायला पाहिजे पण का गेले नाही? याचाच अर्थ राजकीय लोक कोणत्याही मुद्यावर राजकारण करून जनतेची दिशाभूल करत आहेत. आणि जनतेच्या हक्क अधिकार व न्यायाविषयी कोणीच बोलत नाही किंवा शेवटपर्यंत बाजु उचलून धरत नाहीत. सरकार आणि विरोधी पक्ष व नेते दोन्ही ही जनतेच्या विरोधात च काम करत आहेत. जनता महागाई ने होरपळून निघत आहे, तरुण बेरोजगार आहेत, शिक्षणाचे खाजगीकरण करून शिक्षणाचा बाजार केला त्यामुळे सर्वसामान्य लोकांना शिक्षणाची फी परवडणारी नाही आहे. अशा समस्या लोकांच्या असताना यावर चर्चा घडवून न आणता प्रेमप्रकरणा वरुन हिंदु मुस्लिम वाद, जयंती वरून मराठा बौद्ध वाद, आरक्षणा वरुन मराठा ओबीसी वाद पेटवून देतात आणि गुपचूप आमदार खासदारांचे पगार वाढवले जातात. मतदार संघात मंजूर झालेला निधी गायब होतो आणि लाखो रुपयांचे पगार पाहिजे, वरूण पेंन्शनही पाहिजे. एवढ्यावरच हे थांबत नाहीत तर दाढी कटींग साठी यांना वेगळे पैसे पाहिजे, मोफत जेवण्याची फिरण्याची सुविधा पाहिजे, लाखो करोडोचे घर पाहिजे, आलीशान गाड्या पाहिजे, जनतेला मात्र यापैकी काहीच दिले जात नाही. जनतेला फक्त जात धर्म आणि द्वेषावर लढवले जाते आणि त्याचाच वापर पुन्हा राजकीय लोक राजकारण करण्यासाठी करतात. हि भुमिका आणि मानसिकता जोपर्यंत सर्व सामान्य जनता ओळखणार नाही तोपर्यंत शुल्लक कारणावर राजकारण केले जाईल आणि जनतेचे महत्त्वाचे मुद्दे दुर्लक्षित करून समस्या वाढवल्या जातील. राज्यकर्त्यांना वठणीवर आणण्यासाठी सर्वांनी मिळून ईव्हीएम ला विरोध करून बँलटपेपर वर निवडून घेण्याची मागणी करणे आवश्यक आहे. कारण ईव्हीएम च्या माध्यमातून लोकांच्या मताची किंमत शुन्य केली, लोकांच्या मताची गरज त्यांना नसल्याने ते लोकांच्या हिताचे प्रश्न व मुद्दे यावरच बोलतच नाहीत. राजकारणी लोक वैयक्तिक फायदा करून जनतेमध्ये तेढ निर्माण होईल असे मुद्दे हाताळत आहेत. हे थांबण्यासाठी निवडणूक बँलटपेपर घेणे आवश्यक आहे तरच जन हिताचे प्रश्न व समस्या सोडविल्या जातील व निरर्थक राजकारण थांबायला सुरवात होईल.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# 100 टक्के जनता साक्षर होणे गरजेचे

आधुनिक केसरी

**1965 मध्ये 8 ते 19 सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली.यानंतर 1966 साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने 8 सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.तेव्हापासुन जगभरात 8 सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते.हाच उद्देश साक्षरतेचा आहे. कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.**

परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी,भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे.आजही भारतसुध्दा पुर्णपणे साक्षर नाही.याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज आहे. भारत सध्याच्या परिस्थितीत फक्त 60 टक्के साक्षर आहे.देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे.त्या रोखण्याचा संकल्प 8 सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान छेडायला पाहिजे.कारण बदलत्या काळानुसार 100 टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते 100 टक्के साक्षर आहे.आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाही.यातुनच नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो.त्यामुळे त्यांना पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण,भुकमरी, वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो.भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली समस्या आहे.भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा-धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते.यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर छेडायला हवे.जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत प्रत्येकाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे.परंतु जर तो देश साक्षर नसेल तर मागासल्यामध्ये गणल्या जातो.आज पाकिस्तान फक्त 20 टक्के साक्षर आहे.त्यामुळे तो गेल्या 76 वर्षाच्या काळात कवडीचीही प्रगती करू शकला नाही. पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे. त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी 8 सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे.आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो.त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी,खान-पाण,देशाचा विकास, पारिवारिक सुख-दुःख, सुविधा, परिपक्वता, संस्कृती ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता, अतिथंडी ह्या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगल तोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते ह्या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या आहेत. आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती,जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जात असतो ह्याबाबी साक्षरतेमध्ये मोडत नाही.साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा.ॲम्याझॉनसारखे जंगल जळने,वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले, जंगल संपदा मानवाने नष्ट केली यामुळेच आज पृथ्वी भयभीत आहे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोडुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते.याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे.याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे.म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून रोखले पाहिजे. जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी.मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल. चारित्र्य बनविण्यासाठी, चांगलेव्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे.8 सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मक्रणपूर येथील उपसरपंच विनायक सोनवणे यांचे पद रद्द

## युवराज बागुल यांनी घेतली पत्रकार परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरा लगत असलेल्या मक्रणपूर गावातील माजी सरपंच तथा विदयमान उपसरपंच विनायक नाथु सोनवणे,रा. मक्रणपूर यांचे नुकतेच जिल्हा अधिकारी आस्तीककुमार पांण्डेय यांनी पद रद्दचा निर्णय आत्ताच दिल्याने गावातील राजकीय लोकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

पद रद्द झाले म्हणुन बागुल यांनी कन्नड शहरात पत्रकार परीषदेचे आयोजन केले होते. विनायक सोनवणे हे ग्रामपंचायत मक्रणपुर तालुका कन्नडची सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर 2020 मध्ये पार पडली या निवडणुकीमध्ये सोनवणे निवडून आले होते. त्यांनी अतिक्रमण केलेले आहे त्यांचं सदस्यत्व रद्द करा असा तक्रारी अर्ज युवराज यादव बागुल यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिला होता या अतिक्रमाची चौकशी मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक यांच्याकडून करण्यात आली होती. मात्र त्या चौकशी अहवाला मध्ये अलबेल असल्यामुळे पुन्हा चौकशी व्हावी अशी विनंती अर्ज करण्यात आला होता या नंतर तहसीलदार संजय वारकड यांनी नविन चौकशी समिती स्थापन करून वरीष्ट अधिकारी घेऊन मक्रणपूर गावांमध्ये येऊन स्वतः चौकशी केली. यावेळी समितीतील वरिष्ठ अधिकाऱ्यां यांनी आपला वेगवेगळा अहवाल देऊन एक संयुक्त अहवाल तयार करण्यात आला यामध्ये विनायक सोनवणे यांनी नदीपात्रात व सरकारी जागेवर अतिक्रमण केलेले असे स्पष्ट झालेले आहे व ग्राम पंचायत नमुना नंबर आठच्या रजिस्टरमध्ये देखील खोडा खोड केलेचे अहवालात म्हणटले आहे. या सर्व बाबी व पुरावे तपासून जिल्हाअधिकारी आस्तीककुमार पांण्डेय यांनी अर्जदार युवराज यादवराव बागुल राहणार मक्रणपुर तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद यांचा विवाद अर्ज क्रमांक 115 /2021 अर्ज मंजूर करण्यात आला तसेच गैरहजर विनायक नाथ सोनवणे सदस्य ग्रामपंचायत मकरंद तालुका कन्नड महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 14 (1) ज 3 मधील तरतुदीनुसार मकरमपूर ग्रामपंचायत सदस्य म्हणून चालू राहण्यास तात्काळ प्रर्भावाने अपात्र ठरविण्यात येते म्हणून सदस्य पद रिक्त घोषित करण्यात आले असुन प्रकरण बंद केलेचे पत्र तहसीलदार कन्नड, विस्तार अधिकारी कन्नड, ग्रामसेवक मक्रणपुर यांना देण्यात आले .

यावेळी पत्रकार परिषदेत युवराज बागुल बोलताना म्हणाले की विनायक सोनवणे यांचे जिल्हाधिकारी यांनी पद रद्द केल्याने सदस्य पद रद्द झाल्याने उपसरपंच पद ही रद्द झाले आहे म्हणून मी तहसीलदार कन्नड व गट विकास अधिकारी कन्नड यांना विनंती करतो की सोनवणे यांचं पद रद्द झाले असून यांना कुठलाही अधिकार देऊ नये दिला असेल तर तो तातडीने रद्द करावा अशी ही विनंती या पत्रकार परिषद मध्ये करण्यात आली आहे .

# लोणंद येथे पंकजा मुंडेंचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**लोणंद :** दोन महिन्याच्या राजकीय विश्रांतीनंतर भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव व माजी राज्यमंत्री पंकजाताई मुंडे पुन्हा एकदा राजकारणात सक्रीय झालेल्या आहेत. राज्यातून शिवशक्ती यात्रेच्या माध्यमातून त्या जनतेशी संवाद साधत आहेत. त्या पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आल्या असता. त्यांचे पुणे जिल्ह्यासह सातारा जिल्ह्यातून ठिक ठिकाणी स्वागत करण्यात आले. पंकजाताई मुंडे यांनी पुरंदर तालुक्यातील जेजुरी मल्हार गडावर जाऊन खंडोबाचे दर्शन घेतल्यानंतर त्या पुढच्या प्रवासाला जाताना सातारा जिल्ह्यातील लोणंद ता.खंडाळा येथे आल्या असता कार्यकर्ते व पदाधिकारी यांची धावती भेट घेतली.

यावेळी भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंकजाताई मुंडे यांचे स्वागत करण्यात आले.राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या अर्ध्य पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे,सदस्य अनुप सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम,खंडाळा तालुका अध्यक्ष अनिरुद्ध गाढवे,भाजपा युवा वॉरियर जिल्हाध्यक्ष हर्षवर्धन शेळके पाटील,जिल्हा महिला सरचिटणीस वनिता शिर्के, खंडाळा तालुका महिला अध्यक्षा गीतांजली क्षीरसागर, रासपचे फलटण तालुका उपाध्यक्ष महादेव कुलाळ, नगरसेविका दीपाली संदीप शेळके पाटील, नगरसेविका ज्योती डोनिकर, नगरसेविका तृप्ती घाडगे, सत्वशील शेळके पाटील, रवी भोसले, संदीप शेळके पाटील, राहुल घाडगे, प्रदीप क्षीरसागर, तेजस क्षीरसागर, बापुराव धायगुडे, अतुल पवार, श्रीधर सोनवलकर, दीपिका घोडके, नारायण साळुंखे, विजया गुंडगे आदींसह भाजपचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. लोकसभेसह विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागा. सर्व जागा निवडुन आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. पक्ष कायम तुमच्या सोबत आहे. पक्षीय संघटन अजून मजबूत करा, असा सल्ला पंकजाताई मुंडे यांनी जाता जाता पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिला.

# प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत शिक्षण घ्या : प्र-कुलगुरू डॉ. श्याम शिरसाठ

आधुनिक केसरी न्यूज




**औरंगाबाद :** प्रतिकूल परिस्थितीत खचून न जाता ती एक संधी समजून लढायला शिका. कोणत्याही परिस्थितीत शिक्षणापासून वंचित राहू नका. शिक्षणामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन जीवनात यश शिखर गाठता येते, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्याम शिरसाठ यांनी व्यक्त केले. ते पडेगाव येथील सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी शिक्षण उपसंचालक अनिल साबळे, प्रा. सुनील मगरे, प्राचार्य डॉ. मनोहर वानखेडे यांचे प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयात उभारलेल्या सुसज्ज अशा सेमिनार हॉलचे उद्घाटन यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. श्याम शिरसाठ बोलताना पुढे म्हणाले, काळ कितीही बदलला तरी ग्रंथ हे देखील गुरुच असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण वाचन केले पाहिजे. त्यातून आपल्या मनाची मशागत होते. चिंतनशीलता वाढीस लागते. शिक्षण उपसंचालक अनिल साबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "आई ही आपला पहिला गुरु असते तर गुरु हे आपली दुसरी आई असतात. त्यामुळे त्यांना कोणत्याही परिस्थितीत अंतर देऊ नका. करिअरसाठी केवळ डॉक्टर, इंजिनियरच नाही तर त्याहीपेक्षा अनेक संधी आजच्या काळामध्ये उपलब्ध आहेत. त्याकडे विद्यार्थ्यांनी फोकस करावा. कठोर मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्नाच्या बळावर हमखास यश मिळते. क्रांतिबा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या महापुरुषांनी शिक्षणाचे गंगा समाजाच्या तळागाळात पोहोचण्यासाठी कष्ट त्याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे, असेही साबळे म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुनील मोरे यांनी केले. अध्यक्षीय समारोप आणि आभार प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुकेशनी जाधव, डॉ. व्ही. एस. अंभोरे, निकिता तुपे, प्रा. सूरज परघरमोर, रामकृष्ण जाधव, अनिता काकरवाल, मोईन तडवी, असित शेगावकर, श्रीकांत पातोडे, सुचिता अवसरमल, संतोष अंभोरे यांनी परिश्रम घेतले.




महाराष्ट्र Business Katta










# कोवळं मन

आधुनिक केसरी

**एका शायराची ही शायरी खूप काही सांगून जाते. असे असतांना देखील आपल्या हातावरील रेषा दाखवून भविष्य बघण्याचा नाद अनेकांना आहे. आपल्या कार्यक्षमतेवर - मनगटावर, बुद्धिमत्तेवर विश्वास ठेवण्याऐवजी भविष्यावर विश्वास ठेवून त्यावर अवलंबून असणारी बहुतांश मंडळी आज देखील आहेत. एकीकडे अंधश्रद्धा विरोधी कायदा राज्यात अस्तित्वात आलेला असतांना देखील असे प्रकार आजही थांबलेले नाहीत. खरं म्हणजे माझ्या वडिलांनी कधी अंधश्रद्धा पाळली नाही. ते प्रवचन करायचे, आध्यात्माचा त्यांचा अभ्यास होता, मात्र खोटारडे थोतांड त्यांना कधी पटले नाही.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

त्याच संस्कारात माझी देखील वाढ झाल्याने अंधश्रद्धेला मी सतत विरोधच केला. माझी मुलं देखील विज्ञानवादी आहेत. ज्या कोवळ्या वयात काही कळत नव्हतं त्या वयात एका तथाकथित ज्योतिषाने जे सांगितले त्याच्या वेदना मी तब्बल 10 वर्ष भोगल्या.

आज भविष्य हा विषय गोडवासाठी निवडतांना त्यापाठीमागे मी जे भोगलंय, माझं बालपण आणि तारुण्य एका दडपणा खाली कसं गेलं आणि एखादी निरर्थक गोष्ट कोवळ्या मनावर काय परिणाम करून जाते,ते मी स्वतः अनुभवलं आहे.अर्थात खरं खोटं, आणि अंधश्रद्धा कळण्याचं ते वय नव्हतं पण मी जे भोगलं ते आठवलं की आजही मला माझ्या तशा पद्धतीच्या विचार करण्याचं हसू येतं आणि तितकाच स्वतः चा राग देखील.

१९८६-८७ चा काळ असावा. आम्ही सुल्ताणपूर येथे रहायचो. लाल फेटा घातलेला एक ज्योतिषी घरी आला. खरं म्हणजे हात दाखविणे,भविष्य बघणे हे बाबांना कधीच आवडले नाही. परंतु तो ज्योतिषी बाबाला ओळखायचा. आज भाऊसाहेब,तुमच्याकडे चहा प्यायचा आहे असे म्हणून त्यांनी घरात प्रवेश मिळवला आणि आई चहा घेउन आल्यानंतर,"माऊली,तू खूप नशीबवान आहेस...तुला सौभाग्याचं मरण लाभणार आहे" असे म्हणाला. आपण आपल्या पतीच्या अगोदर मरणार,आपल्या नशिबी सौभाग्याचं मरण आहे असे कुठल्याही स्त्री ला म्हटलं तर तिला बरं वाटतं. आपण भरल्या कपाळी जावं, आपल्याला आपल्या साथीदाराचा मृत्यू बघायचे काम पडायला नको ही आपल्या कडील कुठल्याही स्त्री ची सातत्याने भावना असते. आणि नेमके तेच हेरून त्यांनी आपली व्यर्थ बडबड सुरू ठेवली.त्यानंतर आईने बाबांचे भविष्य सांगा असा आग्रह धरला. कमालीचा आग्रह करूनही बाबांनी काही केल्या त्या तथाकथित ज्योतिष्य सांगणाऱ्या माणसाला आपला हात दाखवला नाही.

मी कपाळाच्या रेषा बघून भविष्य सांगू शकतो असे म्हणत त्याने त्याची बडबड सुरूच ठेवली. लाल फेटा, पांढरे धोतर, पांढऱ्या अगदी पिकलेल्या पिळदार जाड मिशा, त्याच्या सोबतीला त्याच्या समवेत असलेले आणखी दोन तरुण शिकाऊ उमेदवार. माझं बालपण हिरावून घेणाऱ्या त्या माणसाचा चेहरा मला आजही जसाच्या तसाच आठवतो. सुल्ताणपूरला आमच्या बैठकीत एक ओट्या सारखी उंचवटा असलेली बैठक आणि समोर लोखंडी पलंग.

बाबा त्या बैठकी वरील गादीवर मोठ्या तक्क्याला टेकून बसलेले.बैठकीच्या खाली,तो इसम बसलेला.

"भाऊसाहेब,तुम्ही हुशार माणसं, पण मनाने लै भोळे.तुमचा कुणीही फायदा घेतं असे नेहमीचे डायलॉग मारून तुमचं अजून 10 वर्षाचे आयुष्य आहे.तुम्ही 10 वर्ष जगणार"असे बोलून तो निघून गेला.त्याच्या बोलण्याचा कुठलाही फरक बाबांवर पडला नाही.माझं वय त्या वेळी जेमतेम 14 वर्षाचं.त्याच्या त्या बोलण्याचा माझ्या बालमनावर खोलवर परिणाम झाला. त्याचं हे बोलणं ऐकून मी विचारात गढून गेलो.वर्ष मोजायला लागलो. आपले बाबा १९९६ ला आपल्याला सोडून जाणार,आई भरल्या कपाळी जाणार म्हणजे आई १९९६ च्या आत केव्हाही आपल्याला सोडून जाणार. तेव्हापासून ना माझं अभ्यासात मन रमलं, ना आई बाबाला कुठे सोडून जायला मन धजावत असे. अचानक मला हे सोडून गेलेत तर...ही भिती मनात



घर करून बसली होती. ना कुणाला मनातलं बोलून दाखवता येत होतं.हे असलं भयानक ओझं १९८६ ते १९९६-९७ पर्यंत तसेच वागवत गेलो. रात्री बेरात्री उठलो की सतत चिंता करायचो. अभ्यासात मन रमत नसायचं.. अन् सारखा विचार करत बसायचो,स्वप्न देखील तशीच पडायची. "विलास, तू उगीचच कुठलाही विचार करतो. तसं काहीही नसतं.

तू हुशार आहेस,तुझ्या अभ्यासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दे व तुझ्या डोक्यातील हे खुळ काढून टाक." अधिकारवाणीने माझी एक मैत्रीण मला बोलत होती. "तुला एम. ए. मराठी ला बी प्लस घ्यायचे आहेत अन् मराठीचा चांगला प्राध्यापक व्हायचं आहे."असं सांगून बुलढाणा येथे माझ्या समवेत शिकायला असणाऱ्या त्या माझ्या २ मैत्रिणी मला समजावून सांगत होत्या. पण तरीही मी मात्र अधिक विचारात आणि काळजीत डूबून जात होतो.मला घरात विलास या नावाने सगळे जण बोलावतात.माझी जवळची मित्रमंडळी मला विलासच म्हणतात आणि त्या मैत्रीणी देखील मला विलास याच नावाने बोलायच्या. १९९६ ला मी एम.ए. ला असताना मी माझं हे न सांगता येणार दुःख त्यांना बोलता बोलता शेअर केलं आणि त्या बिचाऱ्या अधिकारवाणीने मला समजावून सांगत होत्या.

बाबांचे निधन वयाच्या 76 व्या वर्षी 2011 ला झाले.त्यानंतर आई चे निधन 2020 ला झाले. परंतु मी मात्र 10 वर्ष दररोज चिंतेने मरून जात होतो. विचारांची त्या वयात परिपक्वता नव्हती आणि आईवडिलांच्या प्रेमापोटी हे सगळं खोटं असेल असं मन ठामपणे सांगू पण शकत नव्हतं. मी कधीच भविष्य बघितले नाही,श्रद्धेचा पूजक आहे,पण अंधश्रद्धेला कधी थारा दिला नाही.लहानपणापासून तसे संस्कार देखील झालेत,परंतु तरीही कोवळ्या वयातील ऐकलेल्या त्या तथाकथित भविष्यवणीने माझा शैक्षणिक भविष्यकाळ मात्र खराब करून टाकला.

**शेवटी हेच म्हणता येईल की,**
**हांथो की लकीरों के फरेब मे मत आना जनाब**
**ज्योतिष की दुकान पे मुकद्दर नही बिकते**



# वानेगाव येथे मराठा समाजाला आरक्षणासाठी सरपंच मंगेश साबळे यांना जाहीर पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वानेगाव येथे मराठा समाजाला आरक्षण करता पाठिंबा म्हणून गेवराई पायगावचे सरपंच मंगेश साबळे यांना जाहीर पाठिंबा दि. 5 सप्टेंबर 2023 रोजी जालना येथील अंतरवाली सराटी येथील मराठा आरक्षणासाठी बसलेल्या आंदोलकांवर पोलिस प्रशासनाने केलेल्या लाठी माराच्या निषेधार्थ वानेगाव यांनी गेवराई पायगा येथील सरपंच श्री मंगेश साबळे यांनी स्वतः्ची कार मराठा समाजासाठी पाठिंबा म्हणून जाळून टाकली उपोषणास बसलेले मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शविला अंतरवाली जिल्हा जालना यांना वाणेगावकरांनी वाणेगाव येथे मंगेश साबळे यांना बोलून त्यांना पाठिंबा घोषित केला मराठा समाजासाठी आम्ही सर्व पक्षाचे कार्यकर्ते मराठा समाजासाठी पायातील चपला बुटे बाहेर काढून आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असे जाहीर करण्यात आले. सदर कार्यक्रमास गावकऱ्यांनी चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला त्याबद्दल गावकऱ्यांचे शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेचे संभाजीनगरचे जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव, फुलंब्री तालुका अध्यक्ष साईनाथ बेडके व वसंत पाथ्रीकर तसेच वाणेगाव येथील सुभाषराव गायकवाड, शामराव भोकरे, सुखदेव अण्णा जाधव, कारभारी जाधव, बाबुराव जाधव, बाबुराव सोटम, सखाहारी जाधव, शेखर जाधव, राजु जाधव, पंढरीनाथ जाधव, ज्ञानेश्वर जाधव, शंकर शेळके, मनोहर शेळके, कचरू शेळके, गणेश जाधव, नामदेव जाधव, तंटामुक्ती उपअध्यक्ष बाळासाहेब शेळके, प्रभु दांगोंडे, उत्तमराव सोटम, रामराव सोनवणे, रामकृष्ण भोकरे, आनंदा भोकरे, नारायण भोकरे, दादाराव जाधव, अजिनाथ जाधव व गावातील दोन्ही पोलीस पाटील नवनाथ शेळके व सोमिनाथ दांगोडे, राजु शेळके, राजेंद्र छत्रे, विकास शेळके, रमेश जाधव, अण्णा भोकरे, भागवत जाधव, शेजवळ कचरू जाधव, समस्त गावकरी व ज्ञानेश्वर भोकरे यांनी आभार मानले.

# रिसोड आगाराची बुलढाणा बसफेरी पूर्ववत सुरू करा : संभाजी ब्रिगेडची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**अंकुश खरात**

**रिसोड :** येथून बुलढाण्या साठी जाणारी बस फेरी गेल्या अनेक वर्षांपासून सुरळीतपणे सुरू होती. मात्र, मध्यंतरी काही तांत्रिक अडचणीमुळे सदर व फेरी बंद करण्यात आली आहे. परिणामी ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवासी व शालेय विद्यार्थ्यांची पंचायत होत असल्याने, रिसोड ते बुलढाणा ही बस फेरी पूर्ववत सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत संभाजी ब्रिगेडकडून आगार व्यवस्थापक रिसोड यांना निवेदन देण्यात आली आहे. सदर बस फेरी महागाव, मेहकर, चिखली मार्गे जात असल्याने वाशिम, बुलढाणा या दोन जिल्ह्यांना जोडणारी महत्त्वपूर्ण बससेवा आहे. बुलढाणा येथील "क्षय आरोग्यधाम " हे शासकीय रुग्णालय व चिखली येथे उच्च शिक्षणासाठी नामांकित महाविद्यालय असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सदर बस सुरू असणे ही महत्त्वपूर्ण बाब आहे. शिवाय मेहकर व बुलढाणा येथे उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांना सोयीची आहे. त्यातच या मार्गावर नेहमीच प्रवाशांची वर्दळ असते त्यामुळे सदर व बस फेरीला उत्पन्न सुद्धा चांगले मिळते. परंतु बस Lफेरी बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांसह, जेष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना सुद्धा खाजगी वाहनातून धोकादायक प्रवास करावा लागत आहे. त्यासाठी रिसोड ते बुलढाणा ही बसफेरी पूर्ववत सुरू करावी. अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे. आगार व्यवस्थापक दादाराव दराडे यांना निवेदन देतावेळी संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी सर्व शिवश्री रामराव वानखेडे, विनोद खडसे, रमेश सदार, गजानन सरनाईक, शालिक पवार, पुंजाजी ढगे, दुर्गेश लाटे, विठ्ठल गोडघासे, राजू बाजड, नितीन तुरेराव, प्राध्यापक जुनेद, वकार भाई आदींची उपस्थिती होती.



# बाजार सावंगीतील ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये शिक्षकदिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थ्यांनी वैष्णवी गोरे व शितल काळे यांनी केले व या एकदिवसीय शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षकाची भूमिका घेऊन आपले मनोगत व्यक्त केले याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये मुख्याध्यापक पदाची भूमिका शेख फैजान या विद्यार्थ्यांने घेतली व उपमुख्याध्यापक पदाची भूमिका स्वाती घोलप या विद्यार्थिनी घेतली आणि आभार प्रदर्शन सपना नलावडे या विद्यार्थ्यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे, श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील,राहुल गायकवाड, भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव, श्रीमती नलावडे, पाचवने मॅडम, खान मॅडम, चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव, धुमाळ बाबा, यांची उपस्थिती होती.



# जिंतूर महावितरणाच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू

## लोंबलेल्या तारेला स्पर्श होऊन तरुण ठार

आधुनिक केसरी न्यूज

**बी.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरातील इदगा परिसर येथे लोंबलेला ताराला स्पर्श होऊन एका तरुणाच्या मृत्यू झाल्याची घटना घडली असून त्यामुळे शहरातील नागरिका कडून महावितरण विरोधात आक्रोश दिसून येत आहे. परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरातील महावितरण कंपनीचा भोंगळ कारभार सुरू असून वेळोवेळी सांगून सुद्धा महावितरण कडून कोणताही दखल घेतला जात नाही शहरातील डीपी असो की कोंबलेले तार असो शहरावासयांना स्वतःच्या जीव गमावा लागत आहे अशीच एक घटना जिंतूर शहरातील इदगा परिसरातील सय्यद अजमत सय्यद हसन उर्फ बबलू ह्या 27 वर्षे तरुणाचा ताराला स्पर्श होऊन मृत्यू घटना घडली असून घटनेची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे व पोलीस उपनिरीक्षक सय्यद हे घटना स्थळी दाखल होऊन पंचनामा केला व शव ॲम्बुलन्स द्वारे ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे पाठवण्यात आले यावेळी नागरिकांनी महावितरण कंपनी विरोधात आक्रोश व्यक्त करत होते व महावितरणाच्या अधिकारी येऊन पर्यंत शव उचलत नसल्याचे सांगितले मात्र यावेळी पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे यांनी समजूत काढून शव रुग्णालयात पाठवले या परिसरात लोमलेले तारांसाठी अभियंता अमोल कांबळे यांना वेळोवेळी फोनवर कळविले मात्र त्यांनी या विषयावर गंभीरता न दाखवल्यामुळे ही जीव गेल्याची चर्चा होत आहे विशेष म्हणजे महावितरणाचे सर्व कामे खाजगी माणसाकडून काम करून घेण्यात येत आहे याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.



# गोळेगावात कोमेजलेल्या पिकांना संजीवनी

आधुनिक केसरी न्यूज

**गोळेगाव :** परतूर तालुक्यातील गोळेगाव येथे आज सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे चेहरे फुलले आहेत. गेल्या काही आठवड्यांपासून पावसाअभावी कापूस व सोयाबीन पिके करपून जात असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. दुष्काळाची छाया अजूनही कायम असली तरी काल सायंकाळपासून पडणाऱ्या पावसामुळे कोमेजलेल्या पिकांना संजीवनी मिळाली आहे. सुरुवातीच्या पावसामुळे पिके जोमात आली होती, मात्र गेल्या अनेक दिवसांपासून पावसाअभावी पिके करपून गेल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. महागडी खते, बी-बियाणे, कीटकनाशकांवर मोठा पैसा खर्च झाला, त्यामुळे हाती आलेले अन्न हिरावून घेतले जाईल, अशी भीती निर्माण झाली होती.

> जवळपास महिनाभर पावसाचा एक थेंबही पडला नसल्याने शेतकरी चिंतेत होता, मात्र कालच्या पावसाने शेतकरी बांधवांना थोडा दिलासा दिला आणि पिकांनाही नवसंजीवनी दिली !आणि आम्ही चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत आहोत .
> **-भानुदास देवकर, शेतकरी गोळेगाव**

आजच्या पावसाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# पूरग्रस्तांसाठीची नियोजित बैठक राजकीय सूड भावनेतून केली रद्द : प्रशांत डिक्कर

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जामोद :** आगामी गणपती उत्सव, पोळा आज पार पडलेली दहीहंडी उत्सव अशी कारणं समोर करत ८ सप्टेंबर रोजी होणारी पूरग्रस्तांसाठीची बैठक जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द केली. तसे मेलद्वारे पत्र आज स्वाभिमानीचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांना देण्यात आले. ही बैठक रद्द होण्यामागे आ.संजय कुटे यांचाच हात असल्याचा आरोप आज प्रशांत डिक्कर यांनी बोलतांना केला. केवळ दुसऱ्याला याचे श्रेय जाऊ नये यासाठी ही बैठक रद्द करून घेतल्याचा आरोप आज अखेर सयंमाचा बांध फुटलेल्या डिक्कर यांनी केला.  तसेही याच पुरग्रस्तांसाठी पार पडलेल्या अन्नत्याग आंदोलनात याच आ. कुटेंनी किती किती अडथळे आणले. आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या महाविकास आघाडी व वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांसह चाळीस शेतकऱ्यांवर कोणाच्या आदेशाने गुन्हे दाखल झाले. हे आता लपून राहिलेले नाही. जनता ही राजहंस पक्षासारखी आहे.जसे की हा राजहंसपक्षी पाण्यातील फक्त दुध पितो पाणी शिल्लक ठेवतो.हे या पक्षाचे वैशिष्ट्य आहे.तशीच या पक्षासारखी जणता आहे. त्यांना सर्व काही समजते पण ते बोलत नसतात वेळ येईल तेव्हा जनता ज्यांची जागा त्याला दाखवते. अशा तीव्र प्रतिक्रिया ही बैठक रद्द करण्यात आल्यानंतर जनतेत व्यक्त होऊ लागल्या आहेत. पूरग्रस्तांसाठीचे अन्नत्याग आंदोलनात राजकीय विरोधकांनी खोडा घातल्यानंतर शासनाने दखल घ्यावी म्हणून प्रशांत डिक्कर सविनय मार्गाचा



अवलंब करत भूमिगत झाले होते. आत्मदहन होणारच असा एक खा.राजु शेट्टी यांचा व्हिडिओ पण व्हायरल झाल्यानंतर घाबरलेल्या जिल्हा प्रशासनाने आंदोलनकर्ते प्रशांत  डिक्कर यांना जिल्हाधिकारी यांच्या सहिचे पत्र दिले. ८ सप्टेंबरच्या त्या बैठकीत चर्चा होऊन पुरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मार्ग निघणारच यावर विश्वास ठेवून प्रशांत डिक्कर यांनी ४ सप्टेंबर रोजी जळगाव एस. डि. ओ. कार्यालयासमोर हजर झाले होते. त्यानंतर त्यांना अटक होऊन त्यांची जामिनावर सुटका सुद्धा झाली. पुरग्रस्त शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन प्रशांत डिक्कर यांनी बैठकीचे निमंत्रण स्वीकारुन नरमाईची भुमीका घेतली. कारण हे सार काही त्यांनी पुरग्रस्त शेतकऱ्यांच्या भल्यासाठी केले. असे असतांना काल रात्री जिल्हाधिकारी यांनी ती ८ सप्टेंबरची बैठक रद्द केली. तसे पत्र प्रशांत डिक्कर यांना मेलद्वारे प्राप्त झाले. सत्ता त्यांची, तेच आमदार, त्यामुळे जिल्हा प्रशासनावर त्यांची चलती आहे हे वेगळं सांगण्याची गरजच नाही. आ. संजय कुटे यांनीच ती बैठक रद्द करण्याचा कार्यक्रम घडवून आणला. हे एखादा आंधळा, मुका, बहिरा, पण सांगू शकतो. पण असं बरं नव्हें आमदार साहेब प्रश्न पुरग्रस्त साठीचा आहे. असा सवाल आज प्रशांत डिक्कर यांनी प्रसार माध्यमांशी बोलतांना केला. जिल्हा प्रशासनावर तुमचा अंकुश असेल तुमचा शब्द प्रशासनातील अधिकाऱ्यांना ऐकावा लागतो हे आम्हाला चांगल समजते. पण आमदार साहेब पूरग्रस्त शेतकऱ्यांसोबत बेईमानी नाही काय?  फक्त स्वाभिमानी शेतकरी संघटनेला याचे श्रेय जाऊ नये यासाठीच तुम्ही हे काय काय करत आहात ?  ही बैठक रद्द करणे म्हणजे शेतकरी,शेतमजुरांच्या भरल्या ताटात माती कालवणेच आहे असं तुमच्यासाठी म्हणता येईल.पण प्रश्न शेती शेतकरी पुरग्रस्तांचा असल्याने आंदोलनकर्ते प्रशांत डिक्कर जिल्हाधिकाऱ्यांना बैठक रद्दचा जाब विचारण्यासाठी बुलढाणा येथे जाणारच असे स्वाभिमानीचे नेते उज्वल पाटील चोपडे यांनी आज बोलतांना सांगितले.

# खरिप पिकांची भरपाई व विमा द्या :

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे रेल येथील खरिप पिके पावसाअभावी वाया गेली असुन सरकारने पाहणी करून नुकसान भरपाई व विमा द्यावा अशी मागणीचे निवेदन मा.तहसील खुलताबाद यांना देण्यात आले आहे.
यंदा सुरवातीपासूनच पावसाने हुलकावणी दिली आहे. पावसाळ्याचे तीन महिने उलटले परंतु आज पावोतो दमदार जोरदार समाधानकारक पाऊस झाला नाही. नाममात्र व तुरळक पावसावर खरिप पिकांची वाढ झाली आहे. परंतु गत महिना भरापासून पावसाने पाठ फिरवली जेमतेम पावसावर आलेले पिक आजरोजी वाया गेली आहे .महागडी बियाणे खते औषधी मजुरी खर्च करून पेकपेरा लागवड केली परंतु पावसाने पाठ फिरवल्याने पिके वाया गेली व पुढे येण्याची शक्यता ही नाही त्यामुळे सरकारने पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व विमा पैसे आगाऊ म्हणून द्यावे जेणेकरून शेतकऱ्यांना धीर मिळेल असी मागणी शेतकऱ्यांनी मा.तहसीलदार खुलताबाद महसूल नायब तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.
त्यावेळी ग्रामपंचायत सदस्य  मास्तर, सोसायटीचे अप्पा राव जाधव,माचवे सह मान्यवर उपस्थित होते.



# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पिंपळगाव वळण मतेवाडी फाटा येथील आदर्श प्राथमिक माध्यमिक, उच्चमाध्यमिक व ग्रामगीता माध्यमिक शाळेत साजरा करण्यात आला. यावेळी दहावीचा विद्यार्थ्यांनी प्रशासक, मुख्यध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भूमिका केली. मुख्याध्यापिका म्हणून अमृता जगताप, पर्यवेक्षक सत्यम वहाटूळे,लिपिक म्हणून रोहिणी टेकाळे, शिला, तर शिपाई म्हणून जाहेद शेख यांनी ही भूमिका यशस्वी रित्या पार पाडली. एक दिवसाचा विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून आपला अनुभव यावेळी भाषणातून व्यक्त केला. सर्व एकदिवसीय विद्यार्थ्यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्याक योगेश जाधव, मुख्यधापिका अश्विनी जाधव यांनी केले. याप्रसंगी शाळेतील सहशिक्षक सचिन निर्मळ, अन्सार शेख, अनिल गायकवाड, संदीप निधोंनकर, वैशाली तायडे, निता ठाकूर, पुष्पा काकडे, परसराम घुगे, अनिल थोरात, जिवन पवार, भाऊसाहेब शिरसाठ, म्हस्के,आदी सह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानी सोटम हिने केले तर कार्यक्रमाचे आभार संस्कृती पांचाळ हिने मानले.



# पाडळी येथे शाळेमध्ये शिक्षक दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पाडळी :**  पाडळी जि प शाळा येथे संपन्न झाला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन याच्या फोटोपूजन करण्यात आले. त्यावेळेस माजी शिक्षक शेख सर, सोमिनाथ गायकवाड, सजय वहाटुळे, अरूण आघाडे, भिमराव पोलीस पाटील, पुंडलिक निकम, तेजराव आहेवाड, कैलास गायकवाड, श्रीखंडेसर शिदेसर, जोशीसर काळे मॅडम, फलके मॅडम, भरत काळे यांनी अभिनदन व आभार मानले. यावेळी मान्यवरांची भाषणे झाली.

# शांताराई विद्यालयामध्ये मुलींनी फोडली दहीहंडी

आधुनिक केसरी न्यूज



**ताजानापूर :** गोकुळाष्टमी उत्साहात साजरी शांताराई बालक विद्यामंदिर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय ताजानापूर ता. खुलताबाद जि. औरंगाबाद येथे प्रमुख पाहुणे रामकृष्ण काळे आजिनाथकाळे बाबासाहेब काळे मच्छिंद्र काळे सिताराम काळे, भीमराव गायकवाड संतोष शेठ काळे, प्राचार्य गणेश काळे,  प्रा. सुनील इनामदार, कोमल इंगळे, प्रत्यक्ष आहेर, अमोल दांडेकर, नलावडे मॅडम, अतुल गुळवे, भगवान साळुंखे, किरण काळे, शिक्षक कल्पना काळे उपस्थित होते.

# जिंतूरमध्ये सिनेमागृह सुरु होण्याअगोदरच वादाच्या भोवऱ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील सर्वे नंबर 180/ 1/ अ/, ब ,क या जागेसाठी मा. जिल्हाधिकारी( करमणुक ) यांचे कार्यालयात सुरेंद्र गेंदमलजी बांठींया यांनी सिनेमा टॉकीज हॉल/ मल्टीप्लेक्स/ चित्रमंदिर , साठी परवानगी अर्ज केला असल्यास ते सगळे सर्वे नंबर न्यायप्रविष्ठ असल्याने त्या जागेसाठी कुठलीही एन.ए. लेआउट परवानगी नसल्याने परवानगी देण्यात येऊ नये अशी तक्रार संजय रामराव आडे राहणार साईनगर तांडा तालुका जिंतूर यांनी जिल्हाधिकारी ( करमणुक ) विभाग यांचे कार्यालयाकडे केली आहे.

याबाबत सविस्तर मिळालेली माहिती अशी की, जिंतूर येथील जिंतूर जालना रोडवर सर्वे नंबर 180/ 1/ अ /ब, क यामध्ये चित्रमंदिर/ सिनेमा हॉल टॉकीज/ मल्टिप्लेक्ष चालविण्यासाठी परवानगी सुरेंद्र बांठीया राहणार परभणी यांनी मागणी अर्ज दिला परंतु ती सदरील जागा जिंतूर येथील मा. विद्यमान न्यायाधीश"क" स्तर येथे दावा क्रमांक 82/ 2021 न्यायप्रविष्ठ असल्याने व तसेच जुन्या गुरुदेव वेअर हाऊस दुरुस्ती करून येथे चित्रमंदिर/ सिनेमा हॉल टॉकीज/ मल्टिप्लेक्स बांधकाम दाखवले असल्याची तक्रारीत म्हटले आहे. तक्रारी पुढे म्हटले आहे की, सदरील जुनी जागा असून तेथे येणाऱ्या प्रेक्षकांच्या जीवितास भविष्यात धोका निर्माण होऊ शकतो त्याकरिता आक्षेप अर्ज दाखल करत असल्याचे जिल्हाधिकारी ( करमणुक ) दिलेल्या



निवेदनात म्हटले आहे तसेच सदरील जागेचा कोणत्याही प्रकारचा एन.ए. लेआउट व्यावसायिक, औद्योगिक तसेच दावा हा मा. विद्यमान कोर्टात प्रलंबित असल्यामुळे व जुन्या गुरुदेव वेअर हाऊस गोडाऊनची डागडुजी करून जिंतूर येथील जिंतूर - जालना रोडवर असलेल्या ठिकाणी चित्रमंदिर / सिनेमा हॉल टॉकीज /मल्टिप्लेक्ष बांधकाम दाखवले असल्याने तेथे येणाऱ्या प्रेक्षकांच्या जीवितास भविष्यात धोका निर्माण होऊ शकतो. असेही तक्रारी म्हटले आहे. यांचे प्रति मा. धर्मादाय आयुक्त परभणी, जिल्हा आरोग्य अधिकारी परभणी, मा. उपविभागीय अधिकारी सेलू, कार्यकारी अधिकारी सा.बा. विभाग परभणी ,उपविभागीय अधिकारी सा.बा. उपविभाग जिंतूर, मा. पोलीस उपविभागीय अधिकारी जिंतूर, तहसीलदार जिंतूर, पोलीस निरीक्षक जिंतूर , सहाय्यक निबंध जिंतूर व मा. मुख्याधिकारी न.प. जिंतूर यांना दिल्याची तक्रारी नमूद करण्यात आली आहे.



# पाऊस पडावा म्हणून मुस्लिम समाज बांधवांकडून नमाज पठण

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** मागील दोन महिनाभरापासून फुलंब्री तालुक्यात व वडोद बाजार परिसरात पावसाने दडी मारल्याने परिसरातील. पिके पाण्याअभावी वाळत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना याचा आर्थिक फटका बसणार आहे. पाऊस पडत नसल्याने परिसरातील नद्या नाले कोरडे आहे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे परिसरात चांगला पाऊस पडावा म्हणून मुस्लिम समाज बांधवाकडून तीन दिवस नमाज पठण करण्यात येत आहे. परिसरातील मक्का बाजरी, कपाशी आदी पिके पाण्याअभावी वाळत आहे तर काही ठिकाणी पिके वाळून गेली आहे.

मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने आज वडोद बाजार येथे सामूहिक नमाज पठण करून पाऊस पडावा व सर्व सामान्य माणसावर, शेतकऱ्यावर आलेले हे दुष्काळाचे सावट दूर करण्याची प्रार्थना करण्यात आली यावेळी मुस्लीम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आदींसह मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते.

# स.भु. प्रशाला वडोद बाजार येथे खो-खो क्रीडा स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** श्री स. भु. प्रशाला वडोद बाजार येथे१४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील, १९ वर्षाखालील तालुकास्तरीय खो-खो क्रीडा स्पर्धा शालेय समितीचे अध्यक्ष तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री गणेशसिंग गौर सर, श्रीमती पाकीजा साबेर पठाण( सरपंच वडोदबाजार) शाखा अध्यक्ष श्री गणेश पांडे जी, शालेय समितीचे सदस्य तथा वडोदबाजार येथील उपसरपंच गोपाळराव पा. वाघ, डॉ. सुहास वायकोस, कडूबा म्हस्के, अशोक शिंनगारे यांच्या सहकार्याने मोठ्या उत्साहात पार पडली.

या स्पर्धेचे उद्‌घाटन व सरस्वती प्रतिमा पूजन, मा. श्री कानगुले साहेब( तहसीलदार फुलंब्री) मा.श्री विलासराव मोरे (पोलीस निरीक्षक वडोद बाजार )यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून श्री दिग्रसकर साहेब ( पशुवैद्यकीय अधिकारी वडोद बाजार ) श्रीमती काथार मॅडम( वैद्यकीय अधिकारी वडोद बाजार) , श्री आर डी महाजन( गटशिक्षणाधिकारी प.स.फुलंब्री), श्री ढोके साहेब( फुलंब्री तालुका क्रीडा समन्वयक)सर्व मान्यवरांना वृक्ष रोपटे भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते क्रीडा ज्योत पेटवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेमध्ये १).१४ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम क्र. श्री स. भु. प्रशाला वडोदबाजार , तर द्वितीय क्र. गोरक्ष विद्यालय खामगाव.@@ १४ वर्षाखालील मुलींमध्ये प्रथम क्र. गोरक्ष प्रशाला खामगाव तर द्वितीय क्र. न्यू हायस्कूल किनगाव. २).१७ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम क्र. श्री स. भु.प्रशाला वडोदबाजार, द्वितीय क्र. गोरक्ष विद्यालय खामगाव@@ १७ वर्ष खालील मुलींमध्ये प्रथम क्र. गोरक्ष विद्यालय खामगाव, द्वितीय क्र. गिरजा माता विद्यालय कारखाना ३) १९ वर्ष खालील मुलांमध्ये प्रथम क्र. स. भु. प्रशाला वडोद बाजार, द्वितीय क्र. बिवेल्स इंटरनॅशनल स्कूल सांजूळ१९ वर्ष खालील मुलींमध्ये प्रथम क्र. गीता गुरुकुल प्रशाला फुलंब्री, द्वितीय क्र. स्वामी परमानंद गिरी प्रशाला पाल फाटा. वरील सर्व विजेत्या स्पर्धकांना ग्रुप वाईज मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

शाळेचे मुख्याध्यापक श्री गणेशसिंग गौर सर व पोलीस निरीक्षक श्री विलासराव मोरे यांनी स्पर्धकांना खेळाविषयीची नियमावली सांगून विविध स्पर्धांविषयीचे मार्गदर्शन केले. प्राथ. आरोग्य केंद्रातर्फे भाऊसाहेब बेडके यांनी स्पर्धकांना प्राथमिक आरोग्याच्या सुविधा पुरवल्या.तर कार्यक्रमाचे बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री विलासराव मोरे, संभाजी खाडे (पोलीस निरीक्षक वडोद बाजार ) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एस के खेडकर यांनी केले. समारोपानंतर सर्व क्रीडा स्पर्धकांकडून क्रीडा शपथ घेण्यात आली . या क्रीडा स्पर्धेचे आभार प्रदर्शन क्रीडा शिक्षक श्री चंद्रशेखर पाटील यांनी केले. क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम केले.



# खुलताबाद तालुक्यात दुष्काळाची सावट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** खरिप पिक पेऱ्यासाठी बँकेकडून पिककर्ज म्हणून आजपावेतो शेतकऱ्यांचा रक्कम हाती पडली नाही. उधार वा सावकाराकडुन तडजोड करुन महागडी बियाणे खते औषधी मजुरी खर्च करून पेकपेरा लागवड करून पिके वाढवली पण पिके ऐन फुलाऱ्यात असताना गत दिड महिन्यापासून पावसाने उघडीप दिल्याने खरिप पिकांनी मानी टाकल्या वाळली पिके पाहुण शेताकडे शेतकऱ्यांना जावासे वाटत नाही तर तालुक्यात दुष्काळाची सावट तथा दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने शेतकरी भयभित हवालदिल झाला आहे. पावसाळा सुरू होऊन तीन साडेतीन महिने उलटले मात्र यंदा अर्धा ही पाऊस पडला नाही.तर अद्याप ओढे नदी नाले तलाव कोरडे पडून आहे. बँकेकडून पिक कर्ज घेवून खरिप पिक पेरा लागवड करु असे नियोजन शेतकऱ्यांनी केले खरे परंतु आजपावेतो ते कर्ज मिळाले नाही. उधारी सावकार व चीजावस्तु ची तडजोड करून महागडे बि बियाणे खते औषधी मजुरी खर्च करून खरिप पिके वाढवली परंतु पिके ऐन फुलाऱ्यात आले व पावसाने गत दिड महिन्यापासून खंड दडी मारली चांगलीपिके टवटवीत फडफडत असताना ऐन वेळा पावसाने ब्रेक मारला व हाती आलेल्या पिकांनी पावसाअभावी व कडक उन्हामुळे माना टाकत पिके वाळली आहे. बॅकेने पिक कर्ज दिले नाही.एकुणतीकून जुळवाजुळव केली तर निसर्गाने ऐन वेळा फटका दिला आहे. सरकारने खुलताबाद तालुका दुष्काळ जाहीर करून सरसकटपणे शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी तर तदपुर्वी वीम्याची अर्धी रक्कम आगाऊ शेतकऱ्यांना द्यावी अशी मागणी नागरिकांतून शेतकऱ्यांतून होत आहे.

# मोबाईल न दिल्यामुळे बालकाने गाठले रेल्वे स्थानक

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** दि ५ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी ६:३० वा. गुजराल पेट्रोल पंप, अण्णासाहेब पाटील नगर, जळगाव येथून आठ वर्षाचा टीशर्ट घातलेला बालक घरून निघून गेला आहे, अशी माहिती जळगाव आर.पी. एफ.ला मिळाली , आर.पी. एफ चे सहायक उपनिरीक्षक शिवपूजन सिंह साहेब यांनी लागलीच केशव स्मृती प्रतिष्ठान समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रदिप पाटील यांना बोलवून या बालकाला शोधण्यास सांगितले.

हा मेसेज मिळताच आर.पी. एफ जवान व समतोल टीमचे जवान यांनी तात्काळ सर्व येणाऱ्या जाणाऱ्या ट्रेन चेक करीत प्लॉट फॉर्म चेक करणे सुरू ठेवले व काही वेळातच आर.पी.एफचे सहायक उपनिरीक्षक शिवपूजन सिंहव समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रदिप पाटील, विश्वजीत सपकाळे, टीम सदस्य यांनी या बालकाला शोधून काढले, बालकाचा शोध घेतल्यावर बालकाला नाष्टा वगेरे देऊन बालकाचे समुपदेशन करण्यात आले. बालकाचा परिवाराने रेल्वे स्थानक गाठले.

आई - वडील यांनी बालकाला पाहताच हंबरडा फोडला व बालक ही लगेच आईच्या कुशीत गेला. मुलगा आता आई वडिलांना सोडायला ही तयार नव्हता. अश्या वेळी घडलेली सर्व माहिती बालकल्याण समितीला कळवण्यात आली, समितीच्या आदेशाने आई वडिलांचे व मुलाचे आधारकार्ड, कागदपत्रे तपासणी करून प्रोसेस करून समतोल प्रकल्पाच्या माध्यमातून बालकाला सुरक्षित परिवाराच्या स्वाधीन करण्यात आले.

# शिक्षक दिनी असेंड स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शिकविले धडे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शिक्षकांच्या दृष्टीने शिक्षक दिन हा महत्वाचा दिवस मानला जातो.विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने तर हा दिवस अधिक महत्वपूर्ण आणि उपक्रमशील बनत असतो. या दिनी विद्यार्थी सुद्धा आपल्या शिक्षकांचा सन्मान हा विविध उपक्रम हाती घेऊन करत असतात. विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची शाबासकी मिळत असते. शिक्षकदिनी विद्यार्थ्यांसाठी शाळेत शिकविण्यासाठी मोठी संधी मिळत असते.ही संधी विद्यार्थी मिळवित एक अनोखा अनुभव घेत असतात. विद्यार्थी स्वतः शिक्षक बनून आपल्या गुरुजनांना अभिमान वाटेल असे शालेय कामकाजाचे कार्य पार पाडत असतात. थोडक्यात या दिवशी पुर्ण शाळाच स्वतःच्या हाती घेत असतात. निरा पिंपरे ता.पुरंदर येथील असेंड इंटरनॅशनल स्कूल येथे सुध्दा विद्यार्थ्यांचे कौतुक करावे असे कार्य विद्यार्थ्यांनी पार पाडले. काही विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनी स्वतःच शिक्षक बनत विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम केले. विद्यार्थ्यांनी शालेय धडे शिकवित शिक्षकी पेशाचा अनुभव घेतल्या बद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे, सचिव नीता खोमणे व मुख्याध्यापिका सुषमा भुंजे यांच्या सह शिक्षक शिक्षिका आदींनी विद्यार्थ्यांच्या या अध्यापन कार्या बद्दल कौतुक केले. भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती व शिक्षक दिनाचे औचित्य साधून मोठ्या उत्साहात हा दिवस साजरा करण्यात आला.इयत्ता ४ थी, ५ वी व ७ वीचे विद्यार्थी हे शिक्षक बनले होते. त्यांनी नर्सरी पासून ते इयत्ता तिसरी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिकविले.शिक्षक बनलेल्या समिधा निगडे,तन्मय गडदरे,एहसाबू शाह,अभय भोसले, अथर्व साबळे,प्रांजल आधव, र्या साळुंखे, दिप्ती आगम, स्वरांत पिसाळ आदी



विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सन्मानाकरिता पुष्पगुच्छ व ग्रीटिंगकार्ड दिले.शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे यांच्या कडून सर्व शिक्षक शिक्षिकांना शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच मुख्याध्यापिका सुषमा भुंजे यांनी यास्मिन सय्यद,सुरेखा पाटोळे, रुपाली शितोळे, मंजुश्री काटकर, आशालता काकडे, पुष्पा शिंदे,नितीन दगडे,अल्पना फरांदे, दीपिका निगडे, माधुरी ठोंबरे, सुजाता जाधव, किशोरी थोपटे, मनीषा धायगुडे आदी शिक्षकवृंद यांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान केला. इयत्ता दुसरीतील जिया शेख, रोहिणी धुमाळ, सई निगडे, स्वरांजली तांबे आदी विद्यार्थीनींनी नृत्य सादर करून आपल्या गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच गुरू जनांबद्दल मनोगते व्यक्त करून शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे आयोजन सुरेखा पाटोळे यांनी केले तर सुत्रसंचालन अल्पना फरांदे तसेच आभार प्रदर्शन मंजुश्री काटकर यांनी केले.सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# विभागीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी धनंजय गुडसूरकर

## शिरूर अनंतपाळमध्ये होणार तिसरे संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**शिरूर अनंतपाळ :** येथील साहित्य संस्कृती संवर्धन मंडळ व श्री अनंतपाळ नूतन विद्यालय शिक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या विभागीय साहित्य संमेलनाच या संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक धनंजय गुडसूरकर यांची निवड करण्यात आली आहे संयोजन समितीच्या झालेल्या बैठकीत गुडसूरकर यांची एकमताने निवड करण्यात आली.



शिरूर अनंतपाळ येथील साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने यापूर्वी दोन साहित्य संमेलने झाली असून प्रा . भास्कर चंदनशिव व प्राचार्य ग.पी. मनूरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेली ही संमेलने संस्मरणीय ठरली आहेत. तिसरे साहित्य संमेलन दि. ९ सप्टेंबर रोज शनिवारी रोजी शिरूर अनंतपाळ येथे पार पडणार आहे. संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले धनंजय गुडसूरकर हे नामांकित लेखक असून त्यांची चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. महाराष्ट्रातील नामवंत नियतकालिकांतून त्यांचे लिखाण प्रसिद्ध असून सातत्यपूर्ण लेखन करणाऱ्या गुडसूरकर यांचा बालसाहित्य, ललित लेखन, समीक्षा लेखन या प्रांतात वावर आहे. श्रमर्षी बाबा आमटे यांच्या कार्यावर १२५ व्याख्याने देणाऱ्या गुडसूरकर यांचे साहित्य चळवळीत मोठे योगदान आहे. उदगीर येथील प्रबोधन साहित्य परिषदेचे ते संस्थापक अध्यक्ष असून या माध्यमातून ३० वर्षात त्यांनी साहित्यिक उपक्रम राबविले असून शिक्षक विद्यार्थ्यांना लिहिते करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. कथाकथन, एकपात्री प्रयोग यामधून त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. ४० व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे कार्यवाह राहिलेल्या गुडसूरकर यांचे ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनात ही योगदान राहिले आहे . महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ते सदस्य आहेत. माहूर येथे पार पडलेल्या पहिल्या विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष राहिले आहेत. श्री अनंतपाळ नूतन विद्यालय शिक्षण समितीचे अध्यक्ष नामदेवराव जगताप, सचिव प्रभाकरराव कुलकर्णी, साहित्य आणि संस्कृती संवर्धन मंडळाचे अध्यक्ष बालाजी येरोळे, सचिव शिवाजी मादलापूरे यांच्या संयोजन समितीच्या बैठकीत गुडसूरकर यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. आ . निलंगेकर यांच्या हस्ते होणार उद्घाटन या साहित्य संमेलनाचे उद्घाटन माजी मंत्री आ संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते होणार आहे. लातूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व जेष्ठ विधिज्ञ संभाजीराव पाटील हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ साहित्य नगरीत दि. ९ सप्टेंबर ( शनिवार) रोजी होणाऱ्या या संमेलनाच्या उद्घाटन सत्रात लातूरच्या जिल्हाधिकारी सौ. वर्षाताई ठाकूर- घुगे , विशेष पोलिस महानिरीक्षक निसार तांबोळी, शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, शिक्षणाधिकारी मा. नागेश मापारी( मा.), श्रीमती वंदना फुटाणे ( प्रा) , शिक्षणतज्ञ प्रभाकरराव कुलकर्णी हे उपस्थित राहणार आहेत. या संमेलनास रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# राजेंद्र खंडेलवाल यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज


**संभाजीनगर :** श्री परम सद्गुरु महाविद्यालयचे प्राध्यापक आर के खंडेलवाल यांना रविवारी दिनांक 3 सप्टेंबर रोजी छत्रपती शिक्षणमंडळ समितीच्या वतीने आदर्श शिक्षक सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. खंडेलवाल सरांचे कौशल्य शिक्षण व शैक्षणिक कार्याची दखल घेऊन आयोजन समितीने यांना पुरस्कारासाठी निवड करण्यात आली, जिल्ह्या पुरस्कारासाठी एकूण 124 शिक्षकांची निवड झाली. पुरस्कार निवड कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारताचे केंद्रीय अर्थ राज्य मंत्रीडॉक्टर भागवत कराडअध्यक्षस्थानी होते, विश्व फाउंडेशन अक्कलकोट शिवपुरीचे डॉक्टर पुरुषोत्तमराजीमवाले, शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, महाराष्ट्र राज्य परीक्षा औरंगाबाद मंडळाच्या सचिव प्रियाराणी पाटील आयोजन समितीचे अध्यक्ष एस पी जवळकर, भारसाखरे, नक्शबंदी सर व इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत आर के खंडेलवाल यांना आदर्श शिक्षक हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक परिवार मोठ्यासंख्येने हजर होता.
हा पुरस्कार मिळाल्यामुळे आर के खंडेलवाल सरांचे सर्व स्तरामधून सर्व शैक्षणिक संघटना, राजकीय संघटना, विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे त्यामधे प्रकाश पाटील चिखली, कुशल पाटील, शिंदे धुळे, गवळी, तांबे, काकडे, अब्रार,एम खान सर अकोला, बुंदे सरवाशिम, एडवोकेट पाटील, हिंगोली, पाडवे कॉन्टॅक्टर, डॉ. दीपक गावडे, डॉ. रवी साखरे, डॉ. स्विनल खनाळ, विकास गाडेकर, विश्वजीत पाटील, कृष्णा खंडेलवाल वायकोळे, ढाके, डाके मॅडम, वाणी मॅडम, बनकर मॅडम, पडळ मॅडम, शेलार मॅडम, कुलकर्णी मॅडम सर्वांनी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# भगवान राईतकर यांना स्व. मारोतराव कऱ्हाळे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

## विद्यार्थिनींसाठी एक महिन्याचा 'मोफत ऑनलाईन इंग्रजी क्लास'

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री संस्थापित विवेकानंद आश्रम द्वारा संचालित विवेकानंद विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरा आश्रम ता. मेहकर, जि. बुलढाणा येथील इंग्रजी विषयाचे अध्यापक भगवान राईतकर यांना हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनाच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय स्व. मारोतराव कऱ्हाळे आदर्श शिक्षक पुरस्कार -२०२३ जाहीर झाला आहे.



भगवान राईतकर हे इंग्रजी विषयाचे अध्यापक असून इंग्रजी विषयाच्या संदर्भातील 'हॅलो इंग्लिश ग्रामर' हा प्रकल्प विद्यार्थ्यांसाठी राबवितात. शालेय विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप परीक्षेच्या माध्यमातून इंग्रजी विषयाचे स्पर्धा परीक्षेचे ज्ञान विशेष वर्गाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देत असतात. विद्यार्थ्यांचा वक्तृत्व विकास होण्यासाठी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'वक्तृत्व विकास' हा उपक्रम ते राबवितात. राईतकर हे BHAGWAN RAITKAR SIR या यूट्यूब च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इंग्रजी ग्रामर मराठी व्याकरण स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन संगीत मार्गदर्शन मुलाखती इत्यादी विषयाचे मार्गदर्शन करतात. कोरोनाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थिनींसाठी एक महिन्याचा 'मोफत ऑनलाईन इंग्रजी क्लास' यांनी घेतला होता. उपक्रमशील शिक्षक म्हणून परिसरामध्ये राईतकर हे सुपरीचीत आहेत.

राईतकर यांचे राईतकर इंग्लिश हॅलो ग्रामर, राईतकर व्हर्ब बँक, संतांचीये पायी..., आभाळाएवढे ज्यांची उंची..., राईतकर मूलभूत गणितीय सूत्रे, राईतकर इंग्लिश हॅलो ग्रामर फॉर हायस्कूल स्टुडंट्स इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. शिक्षण, संगीत, साहित्य, पत्रकारिता, मुलाखती आणि व्याख्याने इत्यादी क्षेत्रामध्ये भगवान राईतकर यांचे मोलाचे कार्य आहे. राज्यस्तरीय स्व. मारोतराव कऱ्हाळे आदर्श शिक्षक पुरस्कार -२०२३ या पुरस्काराचे संयोजक प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे, मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय हिंगोली यांनी पत्राद्वारे पुरस्कार जाहीर झाल्याचे कळविले आहे. या पुरस्काराचे वितरण ऑक्टोबर महिन्यात होणार आहे.

राईतकर यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य आर.डी. पवार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राईतकर यांचे अभिनंदन केले आहे.

# भंगाराम तळोधी शाळेत शिक्षकदिन साजरा; विद्यार्थी बनले शिक्षक, स्वयंशासन कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपिपरी :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, भंगाराम तळोधी येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती निमित्य 'विद्यार्थी बनले शिक्षक' या माध्यमातून दुपारपर्यंत स्वयंशासन कार्यक्रम पार पडला. शिक्षक हा समाजाचा विकास घडविण्यासाठी, जीवनाला आकार देण्यासाठी ज्ञानदानाचे पवित्र कार्य त्यांच्या हातून घडत असते म्हणून शिक्षकांचा सन्मान म्हणून ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून देशभरात शाळा, महाविद्यालयात साजरा करण्यात येतो. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक सुधाकर मडावी तर उदघाटक म्हणून दुशांत निमकर केंद्रप्रमुख भंगाराम तळोधी उपस्थित होते. त्याचसोबत प्रणिता उईके, सुधीर सहारे, विकास झाडे,राजेश्वर अम्मावार, तानाजी अल्लीवार,मालन धाबर्डे, सरिता पेरकावार, विशाखा मेश्राम उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेत सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. इयत्ता पहिलीत शिकत असलेली स्वरा अम्मावार या विद्यार्थिनीने अद्भुत क्षमतेची चमक



भाषणातून दाखवून दिली आणि शालेय कार्यक्रमात प्रथमच इंग्रजी भाषेत सूत्रसंचालनाचा प्रयोग राजेश्वर अम्मावार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. सूत्रसंचालन मनस्वी कोल्हापुरे या विद्यार्थिनीने केले व विचारपीठावर उपस्थित पाहुण्यांचे आभार देखील तन्वी बुरीवार या विद्यार्थिनीने इंग्रजी भाषेत केले हे विशेष.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रणिता उईके मॅडम यांनी केले. समाजाचा विकास सत्तेने होत नाही,यंत्राने होत नाही तर आदर्श शिक्षकाने होते असे प्रतिपादन केंद्रप्रमुख दुशांत निमकर यांनी केले.शाळेतील सर्व शिक्षकांना गुलाबपुष्प, पेन देऊन गुरूंचा आदर करण्यात आला. शिक्षक बनलेल्या विद्यार्थ्यांना पेन देऊन गुणगौरव करण्यात आला.अखेर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शालेय मंत्रिमंडळ, मीना-राजू मंच यांचे सहकार्य लाभले.

# आश्चर्य... आई-वडील व मुलाचा वाढदिवस एकाच दिवशी; चांदगुडे कुटुंबात अनोखी घटना

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** दि.५ सप्टेंबर हा शिक्षक दिन. मात्र यादिवशी जातपंचायतचे राज्य कार्यवाह तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते कृष्णा चांदगुडे यांचा वाढदिवस जिल्ह्यात चर्चिला गेला. त्याला कारणही तसेच आहे. या दिवशी कृष्णा चांदगुडे यांचा, त्यांच्या पत्नी ॲड.विद्या चांदगुडे यांचाही, इतकेच नाही त्यांचा मुलगा आराध्य याचाही वाढदिवस होता. या अनोख्या वाढदिवसानिमित्त नागरिकांनी त्यांच्या घरी भेट देऊन सगळ्यांचे अभिष्टचिंतन केले.

कृष्णा यांचे वडील व ॲड विद्या यांचे आई वडीलही शिक्षक होते. त्यामुळे शिक्षक दिनाच्या दिवशी त्यांना अपत्य झाल्याने ते आनंद व्यक्त करतात. दि.५ सप्टेंबर भारतभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षकाच्या घरी या दिवशी अपत्य जन्माला आलं तर विशेषच!नाशिकमध्ये एकाच कुटुंबातील तिघे याच दिवशी जन्माला आले आहे. परिवारातील चौघांपैकी तिघांचे वाढदिवस एकाच दिवशी आल्याने आश्चर्य



व्यक्त होत आहे. सामाजिक कामे करून ते अनोखा वाढदिवस साजरा करत असतात. कृष्णजी चांदगुडे देहदान चळवळीचे कार्यकर्ते असून त्यांनी आपल्या मातोश्रींचा मरणोपरांत वैद्यकीय महाविद्यालयाला देह दान करून समाजासमोर आदर्श घडवला आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल गव्हाण शाळेत गोकुळाष्टमी सण धूमधडाक्यात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** यमुना सामाजिक - शैक्षणिक संस्था शेलघर संस्थेमार्फत गोरगरीब व गरजू पाल्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेता यावे यासाठी गव्हाण येथे सुसज्य अशी न्यू इंग्लिश स्कूल गव्हाण शाळा चालविली जाते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच सर्वांगीण विकास व्हावा यासाठी क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रश्नमंजुषा स्पर्धा तसेच मुलांना आपल्या संस्कृतीची माहिती व्हावी यासाठी सर्व पारंपारिक सण शाळेतर्फे साजरे केले जातात. गोकुळअष्टमी सण धूमधडाक्यात साजरा करण्यात आला. बाळ गोपाळांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे



संस्थापक महेंद्रशेठ घरत, एक्झिक्युटीव्ह मेंबर वसंत म्हात्रे, चेअरमन - के.डी. कोळी, कमिटी मेंबर नंदकुमार कोळी, चंद्रकांत घरत, कल्पना म्हात्रे, सचिन घरत, प्रकाश देशमुख, हेमंत पाटील, शाळेच्या मुख्याध्यपिका सपना लाड तसेच शिक्षक वृंद व पालक मोठ्या संखेने उपस्थित होते.



# कापसी येथील नागरिक बसणार स्मशानभूमीत आमरण उपोषणाला

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** नांदेड - हैद्राबाद राज्यमार्गावरील लोहा तालुका कापसी (खु) येथील दलीत समुहापैकी मातंग स्मशानभुमी जागेवर तत्कालीन कापसी खुर्द येथील ग्रामपंचायत सरपंच शांताबाई मारोती कापसे यांच्या कुंटूबातील नागोराव रामराव कापसे हे सरपंच पदाचा कारभार सांभाळतात, गावातील सवर्ण जातीतील मधुकर प्रकाश ढेपे, आनंदा शिवाजी मोगले व गोविंद शंकर मेथे यांनी सरपंच प्रतिनिधी नागोराव कापसे व पार्टीप्रमुख पंडित एकनाथ मेथे यांच्याशी संगणमत करून मधुकर प्रकाश ढेपे, प्रकाश विठ्ठल ढेपे, लक्ष्मीबाई प्रकाश ढेपे, सविता मधुकर ढेपे, शंकुतला आनंदा मोगले, कल्पना गोविंदराव मेथे, गोविंदराव शंकरराव मेथे, विलास गोविंदराव मेथे, आदी लोकांनी ३० ते ३५ गुंठे जमीन बेकायदेशीररीत्या ग्रामसेविका यांच्याकडून नमुना नंबर ८ च्या रजिस्टरला खतवून त्या ठीकाणी ताराचे कुंपण करण्यात आले असुन, बेकायदेशीर नोंदी लावुन केलेले अतिक्रमण काढण्यात यावे व त्यांच्यावर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने कापसी खुर्द येथील दलीत स्मशानभूमी जागेवरच दि.8 सप्टेंबर रोजी लोकस्वराज्य आंदोलन तालुका संघटक एकनाथ रेडे यांच्या नेतृत्वाखाली अमरण उपोषण करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यांना देण्यात आला आहे. दि.1 सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी नांदेड व तहसीलदार लोहा यांना दिलेल्या निवेदनात म्ह्टले आहे की, कापसी (खु) येथील दलीत स्मशानभूमी जागेवर सरपंच, पार्टी प्रमुख, ग्रामसेविका व समाजकंटक यांच्याशी संगणमत करून बेकायदेशीर नोंद लावण्यात आली आहे.या अतिक्रमणामुळे स्मशानभुमीसाठी अडचण निर्माण होत असुन दोषींवर अनुसूचित जाती,जमाती प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात यावे,तात्काळ कार्यवाही नाही झाल्यास स्मशानभुमी जागेवरच लोकशाही मार्गाने अमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा लोकस्वराज्य आंदोलन जेष्ट नेते एकनाथ रेडे यांनी दिला आहे. या निवेदनावर एकनाथ रेडे, देवबा रेडे, तानाजी वाघमारे,नामदेव रेडे, चंपती रेडे, बळीराम सुर्यतळ, संभाजी सुर्यतळ, माधव टोकलवाड, राघो रेडे, नागोराव वाघमारे, नामदेव रेडे, गणेश रेडे, चंपती रेडे,गोविंद रेडे, साहेबराव कांबळे, रावसाहेब क कांबळे, सुदर्शन वाघमारे आदीच्या स्वाक्षरी असलेले निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी नांदेड, पोलीस अधिक्षक नांदेड,मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.नांदेड, तहसिलदार लोहा, गटविकास अधिकारी लोहा, उपविभागीय पोलीस अधिकारी कंधार, पोलीस स्टेशन उस्माननगर यांना देण्यात आल्या आहेत.

# पंतप्रधान घरकुल योजनेतील लाभार्थींचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर

## अशोक चव्हाणांनी केला पाठपुरावा : आयुक्तांनी घेतली दखल

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** नांदेड शहरात मागील अनेक वर्षांपासून विविध योजनेतून गरजू लाभार्थीना घरकुल देवून होणारी गैरसोय दूर केली आहे.या शिवाय पंतप्रधान घरकुल योजना गरजु लाभार्थीना देण्यासाठी हालचाली सुरू झाल्या काही तांत्रीक अडचणींमुळे ते शक्य झाले नाही.या बाबत माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी मंगळवारी ता. (पाच) महापालिकेतील सहआयुक्त गीरीष कदम यांना घरकुलाचा प्रश्न त्वरीत निकाली काढण्याच्या सूचना दिल्याने महापालिकेनी लाभार्थीच्या घरकुलास मंजूरीसाठी वरिष्ठांकडे प्रत्ताव सादर करण्याच्या हालचाली सुरू केल्याने लवकरच घरकुल मिळण्याची शक्यता आहे.

नांदेड शहराचा दिवसेंदिवस विस्तार होत असून भरमसाठ लोकसंख्या वाढते आहे. यातील बेघंराना हक्काचा निवारा देवून होणारी परवड थांबविण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. यापूर्वी मागासवर्गीय लोकांना महानगर पालिकेनी रमाई घरकुल योजनेतून बहूसंख्य गरजु लाभार्थींना घरकुलाचा लाभ मिळुन दिला आहे.दरम्यान पंतप्रधान घरकुल योजना सुरू झाली सदरील योजनेतील लाभार्थ्यांना काहि नियम व अटी बंधनकारक केल्याने लाभार्थीना त्याचा लाभ घेण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. ज्या जागेवर आरक्षण आहे त्या लाभार्थीना सदरील योजनेचा लाभ घेता येणार नाही अशी अट घातल्याने ब-याच लाभार्थींना योजने पासून वंचित रहावे लागले आहे.अनेकदा लेखी तक्रारी सादर केल्या पण याकडे कुणीच लक्ष देण्याच धाडस केल नाही. योजनेतील लाभार्थी महापालिकेकडे चकरा मारून हातबल झाले आहेत. अशोक चव्हाणांनी घेतली दखल शहरातील पंतप्रधान घरकुल योजनेतील बहु संख्य लाभार्थ्यांना मागील अनेक वर्षांपासून लाभ मिळत नसल्याची माहिति अशोक चव्हाण मिळताच मंगळवारी (ता .पाच) महापालिका सहायक आयुक्त गीरीष कदम याना रखडलेल्या घरकुलाघा मार्ग मोकळा करून ताबडतोब लाभार्थीना अनूदान देण्याची व्यवस्था करावी यात विलंब होता कामा नये अशी सूचना करताच पालीकेनी घरकूल मंजूरीसाठी वरिष्ठांना प्रस्ताव सादर करण्याच्या हालचाली सूरू केल्या आहेत. लवकरच हा प्रश्न निकाली निघण्याची शक्यता आहे. सदरील योजनेतील रखडलेल्या कामाबाबत लाभार्थी शाहिर रमेश गीरी यांनी पत्रकार बाबुराव पाटील, ज्यूनीअर जॉनीलीव्हर (रामेश्वर भालेराव), मनपा अभीयंता प्रकाश कांबळे यांच्या कडे व्यथा मांडली असता मंगळवारी (ता. पाच)अशोक चव्हाण यांनाही माहिती दिली असता प्रस्ताव मंजूरीची प्रक्रिया मार्गी लागली आहे. मनपा सहाय्यक आयुक्त गिरीष कदम नांदेड यांनी पंतप्रधान घरकुल योजनेतील रखडलेल्या कामाला गती देण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत .



यापूर्वी नांदेड शहरातील बहूसंख्य लाभार्थींना आम्ही घरकुल योजनेचा लाभ मिळुन दिला आहे . पंतप्रधान घरकुल योजना हि केंद्र शासनाची असल्याने काहि अटि घालून दिल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या . त्या अडचणी आता दूर झाल्याने लाभार्थींचा मंजुरी प्रस्ताव तात्काळ वरीष्ठाकडे सादर करण्यात येईल .लवकरच लाभार्थीस हक्काचा निवारा मिळणार आहे .
**(महापालिका सहायक आयुक्त गिरीष कदम, नांदेड)**

# ज.वि. पवार यांचा कृतज्ञता सोहळा १९ सप्टेंबर रोजी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील सत्यशोधक विचारमंच नांदेड आणि फुले-आंबेडकर विचारधारा यांच्यावतीने दलित पँथर स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या औचित्याने आंबेडकरी चळवळी पुढील समकालीन आव्हाने आणि राज्य व देशभरात दिवसागणिक एससी, एसटी वरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर येत्या १९ सप्टेंबर रोजी येथील कुसूम सभागृहात दुपारी १२ वाजेपासून राज्यस्तरीय आंबेडकरी विचारवेध परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमात ज्येष्ठ आंबेडकरी नेते पँथर ज.वि. पवार यांचा कृतज्ञता सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे यांनी दिली. यावेळी मुख्य संयोजक मनोहर पवार, स्वागताध्यक्ष एन.डी. गवळे व निमंत्रक डॉ. साहेबराव ढवळे, सहसंयोजक सुरेश हाटकर, कार्याध्यक्ष चंद्रमणी भरणे, सत्यशोधक विचार मंचाचे अध्यक्ष कोंडदेव हटकर, फुले-आंबेडकरी विचारधाराचे कार्याध्यक्ष राज गोडबोले, सचिव जी.पी. मिसाळे, श्रावण नरवाडे आदींची उपस्थिती होती. या परिषदेचे उद्घाटन राज्याचे माजी समाज कल्याण मंत्री चंद्रकांतजी हंडारे यांच्या हस्ते होणार असून प्रख्यात आंबेडकरी विचारवंत, प्रखर वक्ते इंजि. राहुल वानखेडे, नागपूर हे परिषदेचे अध्यक्षपद भूषविणार आहेत. आंबेडकरी चळवळीला संपूर्ण जीवन वाहिलेले आंबेडकरवादाचे खंदे समर्थक, ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत आणि दलित पँथरचे सहसंस्थापक ज.वि. पवार यांना माजी खासदार हरिहरराव सोनुले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'आंबेडकरी योद्धा' या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.



# डॉ. डी. बी. जगत्पुरिया यांचा तापी -पूर्णा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** विख्यात कवी- समीक्षक -ज्येष्ठ पत्रकार डी. बी. जगत्पुरिया यांचा खामगाव येथे शिव -बाल-किशोर -युवा साहित्य संमेलनात तापी- पूर्णा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल गुच्छ व रोख रक्कम प्रदान करून संमेलनाध्यक्ष लता गुठे, पविणा शहा डॉ.शिवचरण उज्जैनकर, डॉ. प्रवीण क्षीरसागर, इतिहासकार संशोधक किशोर वानखेडे, श्रीमती ज्योती ठाकरे यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. उज्जैनकर फाउंडेशनचा हा अत्यंत सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल डी .बी. नी संयोजक व उपस्थितांचे कृतज्ञता पूर्ण आभार आपल्या मनोगतात मांडले. ते म्हणाले हा मानाचा पुरस्कार, " हीअक्षरेच आता सारे प्रमाण माझे ही अक्षरेच आता सारे प्रमाण माझे" या जिद्दीने लेखन करायची प्रेरणा देत राहील.. जगतपुरिया यांचे डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. मिलिंद बागुल, न्यायमूर्ती डी आर शेळके, कविवर्य जगदीश देवपूरकर, डॉ. हे अशोक शिरसाट, डॉ .बलराज पांडवे, फिरत्या चाकावरती कार निंबाजी हिवरकर, डॉ. शिवाजी हुसे सतीष तशक इ. अनेकांनी अभिनंदन केले आहे !

# भोकरला दीडेशे जोडप्यांना रुद्रपूजेचा योग


आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** श्रावण मास अतिशय पवित्र मानल्या जातो,अभिषेक,वृत्त वैकल्य,महादेवाचे दर्शन,रुद्र पूजा अशी विविध धार्मिक कार्य या महिन्यात केले जातात. येथील गणराज रिसॉर्ट मंगल कार्यालयात गंगाधर सादूलवार यांनी सोमवारी (ता. चार)शहरातील दिडसे जोडप्यांना यजमान म्हणून रूद्र पूजेचा योग घडवून आणला आहे.

श्रावण मासात विविध सण उत्सव साजरे केले जातात, या दरम्यान रुद्र पूजेचा योग आपल्या सहित इतरांनाही मिळावा ह्या उदात्त हेतूने गणराज रिसॉर्ट मंगल कार्यालयाचे मालक गणराज सादुलवार यांनी शहरातील दिडसे जोडप्यांना निमंत्रित करून त्यांच्या हस्ते रुद्र पूजा व अभिषेक केला. फुलांनी सजवलेल्या महादेव पार्वती व अमरनाथ प्रतिमा शोभायमान करण्यात आल्याने भक्तिमय वातावरण तयार झाले होते.
श्रावणात धार्मिक उत्सव का साजरे करतात या विषयी स्वामीजीनी मार्गदर्शन केले. पूजेत जल अभिषेक, पंचामृत, बिल्वपत्र षोडशोपचार पूजा करून मंत्रोच्चाराने रुद्राभिषेक करण्यात आला. कैलास स्वामी, विशाल स्वामी, गजेंद्र शास्त्री, रंगनाथ स्वामी, महारुद्र स्वामी, साकुंब शास्त्री यांनी मंत्रोचाराने भक्तिमय वातावरण केले. रुद्र पूजा व अभिषेक नंतर महाआरती करण्यात आली.

प्रारंभी सुवाशिनी क्रिएटिव्ह ग्रुप नांदेड यांनी पूजा नृत्य सादर केले. गंगाधर सादुलवार व त्यांच्या परिवाराने केलेल्या नियोजनासाठी अन्नदाते म्हणून पंकज पोकलवार, कृष्णा गोडसेलवार, अमोल शहाणे, महेश चक्रवार, प्रदीप चेपुरवार यांनी आपले योगदान दिले त्यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला. या सोहळ्यासाठी निवृत्त न्यायाधीश कदम, प्रा.व्यंकट माने, पत्रकार रवींद्र संगणवार, बी.आर. पांचाळ, बी.ए. जाधव यांच्यासह मान्यवर यजमानांची उपस्थिती होती आगळ्यावेगळ्या धार्मिक उत्सवाचे अनेकांनी कौतुक केले. शेवटी सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# कायद्याच्या चौकटीत राहून गणेशोत्सव साजरा करा

## नियमांचे उल्लंघन केल्यास कोणालाही सूट नाही : पोलीस निरीक्षक कैलाश देशमाने

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया अवघ्या 10 ते 12 दिवसात श्री गणराया चे आगमन होणार त्यासाठी अनेक गणेशोत्सव भक्त गणेश मंडळ खूप दिवसांपासून आतुरतेने वाट बगतात आज तो क्षण जावळ आला. परन्तु याची खात्रीने जबाबदारी घेणे हे खूप महत्वाचे आहे. त्यासाठी छावणी पोलीस प्रशासन सज्ज झालेला दिसतोय त्या संदर्भात पडेगाव ,मिटमिटा या ठिकाणी या भागातील संपूर्ण गणेश मंडळाचे पदाधिकारी यांना बोलावून तातडीने बैठक घेण्यात आली. बैठकीत आपले काय मत ? पोलीस प्रशासन चे काय नियम व अटी या बाबत चर्चा करण्यात आली. छावणी पोलीस स्टेशन काही महत्वपूर्ण बाबी सांगण्यात आल्या. शरणापूर फाटा,नगर नाका,नेहरू चौक,व लिटल फ्लावर शाळेजवळ जागांवर पोलीस बंदोबस्त असेल . काही गणेश मंडळ DJ आणतील त्यांना आजिबात प्रवेश देण्यास सक्त मनाई असेल, म्हणून या चार ठिकाणी बंदोबस्त करण्यात येईल.

प्रत्येक मंडळा जवळ पोलीस कर्मचारी नेमण्यात येईल ,गणेश मंडळाने रात्री ७ ते १० वाजेपर्यंत ढोल चा सराव करावा,परिसरातील नागरिकांना कुठलाही प्रकारे मंडळाकडून त्रास होणार याची दक्षता घ्यावी,गावातील राजकीय सामाजिक जेष्ठ नागरिकांनी एकमेकांचा दुजा भाव सोडत हा गणेशस्तोस्व साजरा करावा.

कैलास देशमाने यांनी गणेश मंडळातील पदधिकारी याना बोलताना सांगितले कि, प्रत्येक राजकीय नेत्याची पार्श्वभूमी तपासा तो राजकीय नेता गणेश मंडळातून मोठा झाला आहे. तसेच तुम्हाला भविष्यात अशी संधी मिळू शकते .परंतु कायद्याच्या चौकटीत राहून च गणेश उत्सव साजरा करा. मला अभिमान आहे कि पडेगाव मिटमिटा या गावामध्ये कुठलाही जातीभेद न करता प्रत्येक सन ,उत्सव सर्व धर्म समभाव साजरा केला जातो. आम्ही तुम्हाला पूर्ण पाने सहकार्य करू परंतु तुमचा हि आम्हाला सहकार्य लाभले पाहिजे जेणे करून पोलीस व गणेश भक्त यांच्या परम वाढेल परंतु आम्हाला सहकार्य नाही केले तर कोणाला हि सुट्टी नाही व्हिडीओ रेकॉर्डिंग करू शकता मी जे बोलो आहे त्याचे ठामपणे छावणी पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांनी सांगितले.



**बैठकीत या प्रकारे मागणी करण्यात आली** : पडेगाव मिटमिटा येथील गणेश मंडळ छावणी गणेश महासंघ महासंघ समोर येतांना छावणी पोलीस स्टेशन चा बाजूचा मार्ग देण्यात यावा: अशोकनाना आम्ले माजी पोलीस उपाध्यक्ष मंडळाच्या गुणवत्ते नुसार छावणी गणेश महासंघा समोर देखावा सादर करण्यासाठी वेळ देण्यात यावा. दीपक बनकर भारतीय जनता पार्टी तालुका अध्यक्ष परिसरातील लहान मंडळांना व घरघुती गणपती बाप्पा विसर्जनासाठी कुत्रिम विहीर उपलब्द करून देणे, भारतीय जनता पार्टी शहर चिटणीस कैलास वाणी, पडेगाव रोडवर संध्याकाळी वाहतुकीचा अडथळा निर्माण होत अपघाताचे प्रमाण वाढतंय त्यासाठी ट्राफिक पोलीस कर्मचारी देण्यात यावा. : अंबादास मस्के शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रत्येककाने आपले मत विचार खूप छान प्रकारे मांडले जेष्ठ नागरिक म्हणून दादाराव शेजवळ सर्वांचे मनापासून स्वागत केले.

गणेश उत्सव हा सार्वजनिक उत्सव आहे तो शांततेत,महिला मंडळ,जेष्ठ नागरिक याना कुठला प्रकारे त्रास होणार दक्षता घेण्यात यावी सुनील धात्रक हेड कॉन्स्टेबल .तसेच नवनियुक्त अधिकारी प्रमोद देवकाते पोलीस उपनिरीक्षक म्हणून छावणी पोलीस चा पदभार स्वीकार केला गणेश मंडळातील उपिस्थत असलेले नागरिकानी नवनियुक्त प्रमोद देवकाते पोलीस उपनिरीक्षक यांचे हि स्वागत केले. सर्वच मंडळातील पदधिकारी,जेष्ठ नागरिक,राजकीय नेते सामाजिक कार्यकर्ते,गांवकरी मंडळी सुनील धात्रक,श्रीराम बडने, हेड कॉन्स्टेबल उपस्थित होते.




# दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा येथे मोठ्या उत्साहा पूर्ण वातावरणामध्ये कृष्ण जन्माष्टमीदहीहंडी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळेस गावचे प्रथम नागरिक सरपंच मा.नारायण बोरेकार हे प्रामुख्याने उपस्थित होते.

केंद्राचे केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे सर, मुख्याध्यापक कु.शीला सोळंके मॅडम, आदर्श शिक्षक श्री बबलू कराळे, कल्पना चौधरी, बबीता पंडित, रश्मी पानझाडे,किरण साखरकर, दिनकर राऊत, रातीराम मावस्कर सर तसेच सर्व विद्यार्थी शाळेमध्ये आवर्जून उपस्थित होते यावेळेस गोपाळकाला करण्यात आला तसेच दहीहंडीचा कार्यक्रम मोठया उत्साह पूर्ण वातावरणामध्ये शाळेच्या आवारामध्ये " गोविंदा आला रे आला... " च्या सुमधुर आवाजामध्ये दहीहंडी फोडण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना गोपाळकाला वाटण्यात आला. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमांमध्ये उत्साह पूर्ण वातावरणामध्ये भाग घेऊन आपला आनंद द्विगुणित केला.

# हात पकडल्याने माथेफिरू तरुणाविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जळगाव जामोद पोलीस स्टेशन अंतर्गतत येत असलेल्या पिंपळगाव काळे येथे २९ वर्षीय माथेफिरू तरुणाने गावातीलच इयत्ता नव्वीमध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनी चा हात पकडून विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. गावकऱ्यांनी त्याला पकडून केले पोलिसांच्या स्वाधीन.. इयत्ता नववी मध्ये शिकत असलेली अल्पवयीन विद्यार्थिनी तिचे सेंट्रल बँकेचे बंद पासबुक सुरू करण्याकरिता सेंट्रल बँक पिंपळगाव काळे येथे गेली असता त्या ठिकाणी तिने पैसे भरण्याची पावती भरली व ती बँकेच्या बाहेर निघाली त्या ठिकाणी आरोपी सुरेश गजानन बांगर यांनी त्या ठिकाणी जाऊन पीडित विद्यार्थिनीचा हात पकडून छेडखानी केली यावेळी तेथील काही नागरिकांनी आरोपी सुरेश बांगर याला पकडून ठेवले व घटनास्थळावर पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळ गाठून आरोपी सुरेश बांगर याला अटक केली पीडीतीने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी विरोधात पोलीस स्टेशनला अप नंबर 468/2023 कलम 354,354 (अ)यासह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम 2012 चे कलम 8 व बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम 2012 चे कलम 12 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी सुरेश बांगर यास पोलिसांनी अटक केली आहे पुढील तपास ठाणेदार दिनेश झांबरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक अमोल पंडित करीत आहेत.

# अपघातातील गंभीर जखमी युवकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील राहुल कमलाकर देशपांडे(३२)वर्षे



हा युवक दि.२७ ऑगस्टला रोजीच्या रात्रीच्या सुमारास वाघी (ता.जिंतूर) येथून स्कुटरवरून चारठाणा येथे परत येताना रात्रीच्या सुमारास नवहाती तांडा जवळच डांबरी रस्त्यावर स्कुटरवरून घसरल्याने अपघात हा अपघात घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळच्या सुमारास चारठाणा येथून पाव घेऊन खेड्याला विक्री करण्यासाठी जाणाऱ्या एका इसमास अपघात झाल्याचे दिसल्यानंतर त्याने अपघाताची माहिती चारठाणा येथील ग्रामपंचायत सदस्य सय्यद रहेमतअली, शेख युसूफ यांना दिली. त्यांनी अपघाताची माहिती जखमी युवकाचे वडील कमलाकर देशपांडे व चारठाणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड व पवन राऊत ,व्ही.व्ही.गरुड, जिलानी शेख आदींनी घटनास्थळी जाऊन जखमी राहूल देशपांडे यास उपचारासाठी परभणी येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने कोमामध्ये गेल्यानंतर तब्बल दहाव्या दिवशी दि.६बुधवार रोजी या युवकाचे ऊपचार दरम्यान परभणी येथील खासगी रुग्णालयात निधन झाले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# पतंजली योगपीठ परिवारातर्फे सिद्धेश्वर मंदिरास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पतंजली योगपीठ परिवारातर्फे 125 योगसाधकांनी देगलूर तालुक्यातील होट्टल ठिकाणी सिद्धेश्वर मंदिरास भेट दिली व सर्वांनी दर्शन केले, तसेच करडखेड येथील महादेव मंदिराचे दर्शन घेऊन करडखेड धरणास भेट दिली व करडखेड येथील मार्कंडेय मंदिरात रक्षाबंधन सोहळा साजरी केला व सर्वांनी सुरुची भोजनाचा स्वाद घेतला. या सहलीत सर्वश्री दत्तात्रय काळे, पंढरीनाथ कंठेवाड, राम शिवपनोर, सुरेश लंगडापुरे, हनुमंत ढगे, सिताराम सोनटक्के, शिवाजीराव शिंदे हळदेकर, अशोक कुरडे, वसंतराव कल्याणकर, सविताबाई कल्याणकर, गंगामणी अमृतवार, नामदेवराव मोहिते, मैनाताई मोहिते, भानुदास जाधव, कार्तिकाबाई जाधव, रंजनाबाई सोनटक्के, अनिल कामिनवार, शंकरलाल यादव, प्रल्हाद पेंटेवाड, बालाजी कहाळेकर, श्रीराम मोरे, अरुणा मोरे, गंगालाल यादव, लक्ष्मीकांत फुके, गणेश भुसा, अंबिका भुसा, सगुनाबाई भुसा, राजू शेट्टे, रमेश बंडेवार, अश्विनी बंडेवार, शिवम बंडेवार, अथर्व बंडेवार, चंद्रकला दासर, प्रतिभा पाटील, छाया शिरफुले, भगवान मुंडे, अहिल्याबाई मुंडे, कोंडीबा कागणे, सिंधू क्षीरसागर, रंजना वाटोरे, निता कांबळे, राजेश टेकाळे, सविता टेकाळे, सरकाळे बाई, उत्तमराव साठे, कमल साठे, नीलकंठराव जाधव, ताराबाई दळवी, जयश्री कदम, सुरेश किडे, बडवणे मामा, विठाबाई शिंदे, मंगला चमकुरे, अनिता कदम, अनिल कदम, श्रेया कदम, बाबाराव हंबर्डे, संगीता हंबर्डे, सुनीता डांगे, शीला येरावार, मीनाक्षी चिलरगे, मंगला पाटील, सविता पवार, सुनंदा बंडे, मल्लिकार्जुन कामठेकर, चंद्रकांत बोनगुलवार, प्रभावती हरदळकर, किशन भवर, ललिताबाई भवर, प्रभावती पाटील, जयश्री कल्याणकर, लक्ष्मण वाडकर, मीनाताई जाधव, मीना कदम, निलावती पाटील, तमन्ना मावशी, विजय नांदेडकर, दिगंबर क्षीरसागर, सौ क्षीरसागर, स्वामी सूर्यवंशी, छाया ढगे आदींनी सहभाग नोंदवला . याप्रसंगी दत्तात्रय काळे, पंढरीनाथ कंठेवाड, राम शिवपनोर, सुरेश लंगडापुरे, हनुमंत ढगे सिताराम सोनटक्के, तुळशीराम केरले गुरुजी आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. करडखेड येथील गणपतराव कोंडावार, बाबू गड्डपवार, पांडुरंग शिळवणे, बाबुराव उपलंचवार, सायलू गोरठे, अतीश गड्डपवार, अरविंद गड्डपवार, हनुमंत गड्डपवार, शंकर यजरवार, बालाजी उपलंचवार, अनिल रामदिन, शंकर गोणेवार, कोंडीबा झडपे, ओम मंदीलवार, बालाजी जंजरवार आदींनी व्यवस्थापन केले. एक दिवसीय सहलीचा आनंद घेऊन परिवारासह सर्व एकत्र जवळपासच्या परिसरात मंदिरे तसेच प्रेक्षणीय ठिकाणांना भेट देऊन आपली संस्कृतीची माहिती मिळवणे व संस्कृती जपणे सर्वांनी छोट्या छोट्या सहली मधून आनंद उपभोगावा असे अनिल अमृतार यांनी सांगितले. पतंजलीच्या सर्व महिलांनी साधकांना राखी बांधून रक्षाबंधन सोहळा साजरी केला. बैठकीचे व सुरुची भोजनाची व्यवस्था केली परत थेट वासीयांनी केली. दिवसभर स्वच्छ वातावरण ठेवून निसर्गाने पण या सहलीला प्रतिसाद दिला, शेवटी येताना सर्वांनी खानापूर येथील केरले गुरुजी यांच्या भारत मातेच्या मंदिरास भेट दिली असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.






# उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांची परवानगी न घेता पोलिसांनी काढला झेंडा व नामफलक

## एपीआयवर निलंबनाची कारवाई करा : लोकस्वराज्य आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बिलोली :** मौजे करहाळ, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड येथील लालझेंडा व नामफलक कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वनाथ कसले यांनी गैरमंडळीशी आर्थिक संगणमत कुठलीही शहानिशा नकरता तसेच उपजिल्हाधिकारी कार्यालय बिलोली व उपविभागीय पोलिस अधिकारी बिलोली यांची पूर्व परवानगी न घेता अनाधिकृतरित्या झेंडा व नामफलक पोलीस प्रशासनाने घेराव घालून काढला. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवून दोषी एपीआयवर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी घेऊन मौजे करहाळ समाज बांधव व लोकस्वराज्य आंदोलन तालुका शाखा बिलोली कडुन बेमुदत आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.या वेळी असंख्य आंदोलक सामील झाले होते..

# आराध्या पुरीची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरात मागील रविवारी ता.(तीन)(कोरीयन कराटे) स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी कुमारीआराध्या ज्ञानदेव पुरी हिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. १० वी जिल्हास्तरीय तेंग-सु-डो (कोरियन कराटे) अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा व निवड येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालय शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग इंडोर हॉल येथे, जिल्हास्तरीय तेंग-सु-डो (कोरियन कराटे) अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा संपन्न झाली. यावेळी ११ वर्षा आतील -२३ वजन गटात कुमारीआराध्या ज्ञानदेव पुरी हिने स्पारिंग फाईट या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवल्याने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेतील प्रथम मेडल प्राप्त विजयी खेळाडूंना नळदुर्ग रोड, तुळजापुर जिल्हा धाराशिव येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाली आहे. कराटे प्रशिक्षण प्रशिक्षक बालाजी गाडेकर यांनी मोलाच सहकार्य केले आहे. निवडीचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.





# शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** आज सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येवती येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. भास्करराव सांगळे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य .बी.एस .नागरे सर व वसंता मोरे हे होते. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शिक्षक दिनाच्या निमित्ताने वसंता मोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व वर्ग बारावीच्या वर्गासाठी एक पंखा शाळेला सप्रेम भेट दिला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सांगळे काका यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य नागरे सर यांचा आज वाढदिवसा निमित्त संस्थेचे अध्यक्ष काका साहेब सांगळे यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला शुभेच्छा दिल्या शिक्षक दिनानिमित्त स्वयं शासन कार्यक्रम सकाळच्या सत्रात वर्ग पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षक दिन या निमित्ताने स्वयं शासन कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापका पासून ते शिपाई या सर्व भूमिका व्यवस्थित पार पडल्या.

# आर्य चाणक्यच्या गोविंदांनी फोडली दहीहंडी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम्। देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम्॥
या उक्तीस समोर ठेवत भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर पैठण येथील गोविंदांनी तीन मनोरे रचत दहीहंडी फोडली.
कार्यक्रमाच्या प्रारंभीच भगवान श्रीकृष्ण व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनिल कुंभार व मार्गदर्शक शिवराज धनसूरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक शिवराज धनसुरे यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले.
इयत्ता पहिली ते सातवी तील विद्यार्थी भगवान श्रीकृष्ण व राधा यांच्या वेशभूषेत आले होते या समवेतच इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विविध भक्ती गीतावर नृत्य व दांडिया सादर केले. याकरिता विशेष मार्गदर्शन शिखा शहा, राखी धोकटे, मिनाक्षी पिंपळे, समृद्धी डिघुळे यांनी केले. विशेष म्हणजे चि.आरूष किरण गाडेकर याने श्रीकृष्ण चे भक्ती गीत बासरीवर सादर केले तर चि.राघव थोरात यांनी गौळण व भक्तीगीत सादर केले यामुळे कार्यक्रमात विशेष रंग भरला. इयत्ता सातवीतील चार गटांनी अनुक्रमे दहीहंडी करता तीन थरांचे मनोरे रचत सलामी दिली. त्यानंतर एका गटाने अतिशय उत्साहात व रोमांचकपणे दहीहंडी फोडली. दहीहंडी नंतर काल्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात विकास देशमुख, अर्चना गिरवलकर,



वर्षा पाडळकर, शुभांगी सदावर्ते, विलास खर्डेकर सतीश आहेर, प्रमोद काकडे, विनोद सरोदे, सुदाम पोल्हारे, संगीता मोरे, गीतांजली शेवतेकर, सुजाता लोहारे, सुनेजा मठपती, आशिष होट्टे,धीरज हंडरगुळे, बाळू लाड, अर्जुन कुलकर्णी, मनोज शिंगारे, जयश्री चाटुपळे, श्रीमती मोगले, प्रफुल्लचंद्र कावसानकर, गणेश माळवदकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कीर्ती तुपकर यांनी केले तर आभार प्रदर्शन समृद्धी डिघुळे यांनी केले.

# शैलेश सरकटे यांचा सामाजिक उपक्रम; विद्यार्थ्यांना बॅगचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** दिवसेंदिवस जिल्हा परिषद शाळेत घटत्या संख्येमुळे बऱ्याच जिल्हा परिषद शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत जिल्हा परिषद शाळेत अपुऱ्या सोईसुविधा मुळे बहुतेक पालकवर्गाचा कल खाजगी शाळेकडे होतांना आपण पाहतो.काही पालकांना आपल्या मुलांना खाजगी शाळेत शिक्षण देणे परवडण्यासारखे नाही. जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी,जिल्हा परिषद शाळा वाचाव्या, यासाठी शैलेश भाऊ सरकटे मित्र परिवाराच्या वतीने १००० स्कूल बॅग वाटपाचा उपक्रम हाती घेतला आता पर्यंत परिसरातील वेगवेगळ्या ठिकाणच्या जिल्हा परिषद शाळेत स्कूल बॅग वाटप करण्यात आले.

मातरखेड, हिरडव, जांबूल, बाबूलखेड, निजामपूर, कौलखेड,जाफ्राबाद या जिल्हा परिषद शाळेत आता पर्यंत ८०० घ्या वर बॅग वाटप करण्यात आल्या.याचा आज समारोप कार्यक्रम जिल्हा परिषद शाळा आरडव येथे झाला. कार्यक्रमाला उर्वरित स्कूल बॅगचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी आपल्या १००० स्कूल बॅगचा टप्पा पूर्ण केला. मान्यवरांच्या उपस्थितीत बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी मेहकर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार डॉ. संजय रायमुलकर,बळीराम मापारी सभापती कृ.उ.बाजार समिती लोणार जिल्हाप्रमुख शिवसेना शिंदे गट, भगवानराव सुलताने तालुका अध्यक्ष शिवसेना, सदानंद पाटील तेजनकर तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,प्रल्हाद पाटील सुलताने अध्यक्ष सरपंच संघटना,हिम्मत बापू सानप अध्यक्ष- खरेदी विक्री संघ, जीवन भाऊ घायाळ युवासेना तालुका प्रमुख, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विजय मोरे सर, सारडाजी, मोतीराम डव्हळे, युवराज सोनुने,सरपंच समाधान साठे, गजानन मापारी शहराध्यक्ष भाजप, दशरथ बाबा जायभाये, सरपंच डॉ. मोरे (दाभा), सरपंच आबाराव हाडे (बाबुलखेड),सरपंच आश्रु फुके (गुंधा), सरपंच विजय सोनुने ( वढव), सरपंच देविदास बोडखे ( पळसखेड),सरपंच अरुण मुंडे (पिंपळनेर), सरपंच अंकुश मुंढे (पहूर), तारामती ताई जायभाये (भाजप उपाध्यक्ष महिला आघाडी), विजू भाऊ डोईफोडे, तेजराव घायाळ,प्रकाश पोफळे,अशोक पोफळे, प्रताप पोफळे, प्रकाश भाऊ मुंडे,राजू भाऊ भांदूर्गे, केंद्र प्रमुख मुंढे सर, सरपंच आबाराव हाडे ( बाबुलखेड),सरपंच आश्रु फुके (गुंधा), सरपंच विजय सोनुने ( वढव), सरपंच देविदास बोडखे ( पळसखेड) सरपंच अरुण मुंडे (पिंपळनेर), सरपंच विनोद तेजनकर ( वडगाव), सरपंच अंकुश मुंढे (पहूर),गजानन सरकटे (आरडव सरपंच), मनोज तांबिले (वेणी सरपंच),प्रवीण भाऊ देशमुख, राजकुमार दळवी,सरकटे सर,बबन महाराज, सुरेश हाडे, केशवराव देव्हडे, लोडू पाटील सुलताने व समस्त गावकरी मंडळीची उपस्थिती होती.



उपक्रम कौतुकास्पद : शैलेश भाऊ मित्र परिवाराने जो जिल्हा परिषद शाळेतील मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी उपक्रम राबविले ते कौतुकास्पद असून त्यांनी जे सामाजिक काम सुरू केले आहे ते अतिशय सुंदर असे आहे .त्याचे मनापासून मी अभिनंदन करतो . -आमदार संजय रायमुलकर

# मूकबधिर विद्यार्थ्यांसोबत केला वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** निवासी मूकबधिर विद्यालय, बायपास रोड, बाबूपेठ, चंद्रपूर येथे सोमवार दि. 4 सप्टेंबर रोजी प्रा. डॉ. विमल दखने यांचा वाढदिवस अत्यंत साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून कु. नंदिनी कष्टी वर्ग ४था, कु. हिरफा मो. शेख वर्ग ६वा व युवराज मुकेश सिंग वर्ग ३रा ह्या मुकबधिर विद्यार्थ्यांचे वाढदिवस त्यांचे बर्थ डे केक कापून, भेटवस्तू देऊन व सर्वांना खाऊ वाटून थाटामाटात व अत्यंत हर्षोल्हासात प्रातिनिधिक स्वरूपात साजरा करण्यात आला. अरविंद वानखेडे यांनी विद्यार्थ्यांसोबत हितगुज साधत त्यांना नकारात्मकता त्यागून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सुप्त गुण व प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर सकारात्मकरीत्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत शालेय अभ्यासात तसेच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर यशाची उच्च शिखरे गाठत सुजाण नागरिक म्हणून उदयास येऊन नावलौकिक प्राप्त करण्याविषयी मौलिक मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. विमल दखणे यांनी बोलता व ऐकता न येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवणे हे अत्यंत कठीण व आव्हानात्मक काम असून ते सक्षमरीत्या निरंतरपणे पार पाडून खऱ्या अर्थाने समाजकार्य करीत असल्याबद्दल या विशेष शिक्षकांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना सुद्धा आपल्या गुरुजनांच्या अथक प्रयत्ना विषयी कृतज्ञता बाळगून त्यांचे व माता-पित्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी अथक परिश्रम करण्याचे आवाहन केले. वक्त्यांनी केलेल्या मार्गदर्शनपर भाषणांचा मूकबधिर विद्यार्थ्यांना समजेल अशा प्रभावी रितीने प्रत्येक वाक्यनिहाय अन्वयार्थदर्शक अनुवाद नीता उईके मॅडम यांनी केला. यावेळी मरणोत्तर नेत्रदान संकल्प पूर्ण करणारे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी दिवंगत भानुदास हरिभाऊ वानखेडे यांचे स्मृती प्रित्यर्थ वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. कालिदास बल्की यांनी भूषविले, संचालन अजय वैरागडे सर तसेच आभार प्रदर्शन श्री. विश्वास ताकसांडे सर यांनी केले. यावेळी जसुंदा बन्सोड, कविता कमलाकर, ऋग्वेदा कमलाकर व निवासी मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी वर्गा ची उपस्थिती व सक्रिय सहभाग होता.





# राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटोदा तालुकाध्यक्षपदी दीपक दादा घुमरे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पाटोदा तालुका अध्यक्ष पदी दिपक दादा घुमरे यांची निवड झाल्याने त्यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला अच्छे दिन येणार असुन दिपक दादा घुमरे हे शुध्द चारित्र्याचे आणी शाहु फुले आंबेडकर चळवळीतील खंबीर नेतृत्व असल्याने पक्ष वाढीस त्याची मोठी मदत होणार आहे.

सर्व सामान्य नागरिक,शेतकरी, शिक्षक, विद्यार्थी यांच्या विविध प्रश्नांसाठी दिपक दादा घुमरे यांनी आवाज उठवला असल्यामुळे घुमरे यांची तालुकाभरात चांगली ओळख असल्याने पाटोदा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला धाडसी व सर्व समाजात मिळुन मिसळून चालणारा चेहरा मिळाला असल्याने येणाऱ्या जिल्हा परिषद लोकसभा व विधानसभा निवडणूकीत यांचा मोठा फायदा होणार असुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते व नामदार धनंजय मुंडे, आमदार बाळासाहेब आजबे काका,माजी आमदार अमरसिंह पंडित, सहकार महर्षी रामकृष्ण बांगर,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शिवाजी राऊत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दिपक दादा घुमरे यांना मुंबई येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस भवन येथे पाटोदा तालुका अध्यक्ष पदाचा पदभार देण्यात आला. यावेळी दिपक दादा घुमरे बोलताना मनाले गोर गरीब जनतेची कामे पक्षाच्या माध्यमातून मार्गी लावणार तसेच आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीतही सर्वच जागेवर पक्षाचे उमेदवार निवडुन आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नूतन तालुकाध्यक्ष दिपक दादा घुमरे यांनी सांगितले पाटोदा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या तालुकाध्यक्ष पदी दिपक दादा घुमरे यांची निवड झाल्याने तालुक्यात जल्लोष होत आहे.

# टिटवी येथे जिल्हा परिषद शाळेत गोकुळाष्टमी साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी येथील उच्च माध्यमिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या प्रांगणात श्रीकृष्ण अवतार दिनानिमित्त गोकुळाष्टमी व दहीहंडी व गोपाळकालाचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक अरुण गवळी व ज्ञानेश्वर मख यांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णच्या प्रतिमेचे व दहीहंडीचे पूजन करण्यात आले. शाळेतील सर्वच चिमुकल्या विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. शाळेतील शिक्षक शाळेचे व्यवस्थापन समितीचे विष्णू राठोड व पोलीस पाटील ज्ञानेश्वर राठोड यांनी गोपाळकाला या उत्सवाबद्दल माहिती सांगितली. तर एन एस मोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक अरुण गवळी, एम एस मेमाने,जी एन चांदणे, विद्यार्थ्यां माता, पालक आदी उपस्थित होते. पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थी शाळेत आले होते. दहीहंडी फोडून, प्रसाद वाटप करत हा दिवस मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा टिटवी येथे श्रीकृष्ण अवतार दिनानिमित्त जन्माष्टमी आणि दही हंडी मोठ्या आनंदात आणि उत्साहाने साजरी करण्यात आली. शाळेच्या मैदानात हा उत्सव साजरा करण्यात आला. भगवान कृष्ण आणि दही हंडी यांच्या प्रतिमांसह या कार्यक्रमासाठी शाळेचे मैदान सुशोभित करण्यात आले होते विद्यार्थी व विद्यार्थांनी मुलींनी मैय्या राधाची वेशभूषा या विद्यार्थ्यांनी कृष्णाची वस्त्रे परिधान केली होती. शाळेच्या मैदानात दही-हंडी बांधण्यात आली. जन्माष्टमी गाण्यांच्या तालावर विद्यार्थी आणि शिक्षकांनी नृत्य केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी भजनांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गोप - गोपिकांचा वेश परिधान केलेला होता विद्यार्थांनी ' ढोली तारो ढोल बाजे ' या गितांवर बहारदार नृत्य सादर केले.तर ज्ञानेश्वर मख सर यांनी ' बाजाराला विकण्या निघाली ' ही संत एकनाथांची गवळण सादर केली.मुख्याध्यापक अरुण गवळी उपस्थितांचे आभार मानले मुख्याध्यापक अरुण गवई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डी आर सैतवाल यांनी केले तर आभार एन एस मोरे यांनी मानले, सदर कार्यक्रम यशस्वी होणेसाठी प्राथमिकयाच्या शिक्षक-शिक्षिका- शिक्षकेतर बंधु-भगिनींनी मोलाचे सहकार्य केले.व श्रीकृष्ण अवतार दिनानिमित्त व दहिहंडीचे उदाहरणे देऊन कार्यक्रमाची सांगता केली.

# मराठा आरक्षणाची धग चौथ्या दिवशीही कायम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात शिवाजी महाराज चौकात तासभर ठिय्या आंदोलन करतांना मराठा क्रांती मोर्चा चे कार्यकर्ते यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर बुधवार (ता.०६) सोयगाव शहर बंद पुकारण्यात आला होता या बंदला शंभर टक्के प्रतिसाद देऊन व्यापाऱ्यांनी सायंकाळ पर्यंत सर्वच दुकाने बंद ठेवून बंद मध्ये सहभागी झाले होते दरम्यान बंद दरम्यान मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात बुधवारी पहाटे नऊ ते अकरा वाजेपर्यंत दोन तास ठिय्या आंदोलन करून निदर्शने करण्यात आली मराठा क्रांती मोर्चा च्या वतीने बुधवरी बंद पुकारण्यात आला होता यावेळी शहरातील सर्वच दुकाने शंभर टक्के बंद होती त्यामुळे या बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला आहे दरम्यान बंद दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौकात सोयगाव-फर्दापूर



रस्त्यावर दोन तास मराठा क्रांती मोर्चाचे तालुका समन्वयक विजय काळे यांच्या नेतृत्वाखाली शांततेत करण्यात आला होता यावेळी दत्तू गाडेकर रवींद्र काळे आदींनी क्रांती मोर्चा समन्वयकांना शांततेत बंद पाळण्याची आवाहन केले शहरातील सर्वच दुकाने बंद होती त्यामुळे शहराची लाईफ लाईन विस्कळीत झाली होती.

मराठा क्रांती मोर्चाच्या तालुका समन्वयक विजय काळे यांच्या नेतृत्वाखाली रवींद्र काळे मयूर मनगटे दत्तू गाडेकर आदींनी बंद मध्ये सहभागी होण्याची आवाहन केले होते यावेळी शहरात सोयगाव पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता मराठा क्रांती मोर्चा च्या वतीने पाळण्यात आलेला बंद शांततेत यशस्वी झाला होता व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता सायंकाळी सहा वाजता मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने तालुका प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले यामध्ये मराठा आरक्षणाचा अध्यादेश तातडीने जाहीर करावा व अंतरवली सराटी येथील आंदोलकावर झालेल्या गोळीबारची उच्च स्तरीय चौकशी करावी व कारवाई करण्यात यावी अशा विविध मागण्या नमूद केलेल्या आहे बंद यशस्वी करण्यासाठी यावेळी रवी काळे,विजय काळे, आबासाहेब काळे,कैलास काळे,विजय चौधरी,कूष्णा पाटील, सुनिल ठोमरे, प्रदिप चौधरी, हर्षल काळे, मयुर मनगटे, बापु मानकर, भास्कर चौधरी, किरण पाटील, गोपाल चौधरी, ॲड. योगेश पाटील, श्रीकांत बोरसे,सोपान काकडे, योगेश चौधरी, भागवत थोटे,भागवत रोकडे, महेश मानकर, राजू पोटदुखे, एकनाथ गोड, भिका धोबी, कृष्णा पोटदुखे, कूष्णा कोलडे, दत्तु निकम, विजय जावळे, राजु जजांळ, अनिल गोतमारे, अरुण चौधरी, अनिल चौधरी, समाधान काळे, भगवान वाघ, दीपक चौधरी, सजंय जाधव, किशोर जाधव, कृष्णा चौधरी आदी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला होता.

# नगाड्याच्या तालावर नक्षलवाद्यांचे नृत्य

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** मागील काही वर्षात पोलिसांनी केलेल्या कारवायांमुळे कथित नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे. त्यामुळे नक्षल्यांच्या हिंसक कारवाया कमी झाल्या असून ही चळवळ संपण्याच्या मार्गावर आहे, अशी चर्चा सुरू असताना महिला आणि पुरुष नक्षलवादी ढोल, नगाड्याच्या तालावर नृत्य करीत असल्याची चित्रफीत समाजमाध्यमावर सार्वत्रिक झाली आहे. गेल्या तीन दशकांपासून गडचिरोली जिल्हा नक्षल्यांच्या हिंसक कारवायांमुळे होरपळून निघत आहे. तेलंगण आणि छत्तीसगड सीमा लागून असल्याने या भागात ते कायम सक्रिय असतात. परंतु पोलिसांनी मागील काही वर्षांपासून राबविलेल्या आक्रमक नक्षलविरोधी अभियानामुळे नक्षल चळवळ खिळखिळी झाली आहे. त्यामुळे हा परिसर आता नक्षलमुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.